नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018
महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २३५ * * नागपूर * | सोमवार, दिनांक २ डिसेंबर २०२४ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्रलेख खरीखरी...

## महाराष्ट्रात शून्य प्रहर

आपल्या महाराष्ट्रात सध्या सरकार आहे की नाही. म्हणजे सरकार नसले तरी महाराष्ट्राचा कारभार चालू शकतो. याचा अनुभव या पाच वर्षात अनेकदा आलेला आहे. २०१९ च्या निवडणुकीनंतर हे सरकार येणार, ते सरकार येणार अशा बातम्या वर्तमानपत्रांची पाने भरण्याकरता रोज येत असत. कितीतरी महिने महाराष्ट्रात तेव्हाही सरकार नव्हते. पवार साहेबांनी आयडिया लढवून भलेबुरे सरकार स्थापन केले होते. मग अचानक शरद पवार उसळले आणि ते सरकारही कोसळले. त्यानंतर आपले उद्धवराव आले. मात्र या कालखंडा दरम्यान अंदाजे दीड ते दोन महिने सरकार नावाची चीज महाराष्ट्रात अस्तंगत झालेली दिसत होती. अडीच वर्षांपूर्वी पुन्हा आमदारांचे पलायन झाले आणि उद्धवजींच्या राजीनाम्यानंतर तोच प्रकार चालू झाला. मग भाजप आणि शिंदे सेनेचे द्विपक्षीय सरकार केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मस्तपैकी चालवले. त्यानंतर मग महाराष्ट्राला आणखी काही नेत्यांची गरज आहे, याचा साक्षात्कार झाला. तेव्हा भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचे समसमान मंत्री शपथ घेते झाले. पुन्हा त्यानंतरही वर्षभरात अनेक मंत्रीपदोच्छुक आमदार सुसाटपणे धावत धावत आपल्या मंत्रीपदाची शपथ घेण्यासाठी आसुसलेले होते. पण त्यांची शपथ होण्याऐवजी अजित दादा आणि त्यांचे सहकारी यांना शपथ देण्यात आली. आम्ही अनेक वेळा लिहिले होते की, बाहेरून आलेल्या दोन्ही पक्षांच्या आमदारांपैकी २५ टक्के आमदार मंत्री झाले. भारतीय जनता पक्षाला फक्त दहा टक्के आमदारांनाच मंत्री करण्यात आले होते. त्यानंतर लोकसभेची निवडणूक आली आणि जवळ जवळ दोन ते अडीच महिने आचारसंहितेमुळे शासन ठप्प झाले होते. भारताच्या इतिहासात सर्वाधिक लांबलेली निवडणूक यावर्षी घेण्यात आली होती. त्यानंतर आपल्या विधानसभेची सर्वात कमी लांबीची निवडणूकही आपण अनुभवली. हे सर्व झाले आणि २३२ हिरे निवडून आले. या हिऱ्यांपैकी ज्यांना ज्यांना कोंदणात बसवायचे आहे. असे बरेच मूल्यवान हिरे कितीतरी दिवसापासून सारे स्पष्ट दिसत असले. तरी चष्मा लावून आपल्या मंत्रीपदाची सुखस्वप्ने रंगवित आहेत. परंतु तीन पक्षाचे तीन नेते मुंबई ते दरे जिल्हा सातारा, मुंबई ते बारामती जिल्हा पुणे अशा सहलीवर सहली काढत आहेत. सध्या असलेल्या सत्ताधारी पक्षाजवळ कमी-जास्त२३२ आमदार आहेत. तरी यांची बत्तीशी कशासाठी गटांगळ्या खात आहे? ते सामान्य लोकांना कळतच नाही. जे ही खरीखरी वाचतात आणि जे ही खरीखरी लिहीतात. त्यांना यातली खरी गोम माहीत आहे. पण त्याची वाच्यता करून, उगाच कशाला आपली जीभ बाटवावी असा साधा विचार करून ज्या येतात. त्या बातम्या ऐकण्याचे आणि छापण्याचे काम सुरू असते. आचार संहिता संपल्यावरही सुरू असलेली ही विचार संहिता आहे. असे म्हणतात की, येत्या पाच तारखेला महाराष्ट्राच्या हितासाठी कार्यक्रम सुरू करणार आहेत. तसे पाहिले तर आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्राचे हित आणि महाराष्ट्राच्या जनतेचे हित याचा भरभक्कम विचार करून इतके हिताचे निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे खरे म्हणजे आता पुढील काही महिने तरी केवळ या निर्णयांची अंमलबजावणी केली. तरी जनता यांना दोष देणार नाही. आचार संहितेपूर्वी ओव्हरटाईम करून दररोज मंत्रिमंडळाच्या बैठकांचा भडीमार झाल्यामुळे आता आणखी काही महिने सरकारने काही केले नाही किंवा सरकार स्थापन न करता, स्थापन करण्याच्या प्रतीक्षेतच काही दिवस घालवले. तरी फारसा फरक पडणार नाही. एक अशी म्हण आहे की, 'जो धक्के से चले उसे कार कहते है, जो बिना धक्के से चले उसे सरकार कहते है' अशा प्रकारची भरभक्कम कामगिरी केलेल्यांची आपल्या महाराष्ट्राच्या राजकारणात भरमार आहे. सत्तारूढ आमदारांचे प्रचंड बहुमत असल्यामुळे अनेक आमदारांना नाराज करण्यापेक्षा सध्याचे काळजीवाहू सरकार तसेच चालवले तरी हरकत नाही. महाराष्ट्राची जनता तुम्हाला यापुढेही भरभरून मते देईल, सत्ता देईल आणि भत्ताही देईल. महाराष्ट्रात विधान सभेप्रमाणे शून्य प्रहर सुरू आहे. असे समजावे आणि ज्याला जे वाटेल त्याने ते करावे!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## छत्तीसगड-तेलंगणा सीमेवर

# एका महिलांसह ७ नक्षलवाद्यांचा खात्मा

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या दौऱ्यापूर्वी नक्षल कारवाया तीव्र**





■ महासागर प्रतिनिधी
जगदलपूर, दि. १ :
छत्तीसगड-तेलंगण सीमेवर ग्रेहाऊंड्स फोर्सने एका महिला नक्षलवाद्यांसह ७ नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. जवानांनी घटनास्थळावरून ए-४७आणि इतर शस्त्रेही जप्त केली आहेत. सकाळपासून दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. हे प्रकरण तेलंगणातील मुलुगु जिल्ह्यातील इटुनगरम पोलिस स्टेशन परिसरातील आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चकमकीनंतर सुरक्षा दलांनी सर्व नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. परिसरात अजूनही शोधमोहीम सुरू आहे. असे सांगण्यात येत आहे की नक्षलवादी काही मोठे गुन्हे घडवून आणण्याच्या योजना आखत होते, परंतु जवानांनी त्यांना चकमकीत ठार केले. या आठवड्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा देखील बस्तरला जाणार आहेत. चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह जवानांनी बाहेर काढले आहेत.

**ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटली**

ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटली आहे. यामध्ये तेलंगणा राज्य समिती सदस्य, विभागीय समिती सदस्य, क्षेत्र समिती सदस्य आणि २ पक्ष सदस्यांचा समावेश आहे. सुरक्षा दलांनी सर्व नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. या वर्षात राज्यात २०७ हून अधिक नक्षलवादी मारले गेले आहेत.

केंद्रीय गृहमंत्री शहा यांच्या दौऱ्यापूर्वी नक्षल कारवाया तीव्र झाल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात छत्तीसगडच्या दौऱ्यावर जाणार आहेत. बस्तर येथे ऑलिम्पिक क्रीडा कार्यक्रमाच्या समारोप समारंभाला उपस्थित राहणार आहेत. याशिवाय नक्षलवाद संपवण्याच्या रणनीतीबाबत अमित शहा प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत.

## महायुतीत मतभेद नाही -शिंदे

- गृहखात्यावर मौन
- विश्रांतीसाठी गावी आलो
- पदाबाबत उद्या निर्णय



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
राज्यात सत्ता स्थापनेचा तिढा सुरू असताना काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अचानक त्यांच्या मूळगावी दरे येथे गेले होते. तेव्हापासून राजकारणात विविध चर्चांना उधाण आले होते. त्यांची तब्येत बिघडल्यामुळे ते आराम करण्यासाठी गावी गेल्याचे सांगण्यात आले होते. एकनाथ शिंदे यांनी आज दरे गावात माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना सत्ता स्थापन होत असताना गावी जायचे नाही का? असा सवाल त्यांनी केला आहे. मी नेहमीच गावी येत असतो, असेही ते म्हणाले.

महायुतीमध्ये समन्वयाचा अभाव नाही. मुख्यमंत्री कोण असेल याचा निर्णय नरेंद्र मोदी, अमित शहा घेतील. मी माझी भूमिका याआधीच स्पष्ट केली आहे. भाजपचे वरिष्ठ जो निर्णय घेतील, त्याला शिवसेनेचा पाठिंबा असेल, असे स्पष्टीकरण एकनाथ शिंदे यांनी दिले. दरम्यान, यावेळी त्यांना गृहखात्यावरून सुरू असलेल्या वादाबद्दल तीनदा विचारण्यात आले. मात्र, शिंदे यांनी त्यावर बोलणे टाळले.

**श्रीकांत शिंदेंबाबतच्या माध्यमांमध्ये चर्चा**

उपमुख्यमंत्री पदासाठी श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. या सर्व चर्चा माध्यमांमध्ये सुरू आहेत. आमची अमित शहांसोबत एक बैठक झाली आहे. आता तिनही पक्षांच्या नेत्यांची दुसरी बैठक देखील लवकर होणार आहे. त्या बैठकीत चर्चा होऊन महाराष्ट्राच्या हिताचा निर्णय होईल, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

## ईव्हीएम हॅक करण्याचा दावा करणाऱ्यावर एफआयआर

**महाराष्ट्रात ६३ जागांवर ईव्हीएम हॅक -सय्यद शुजा**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) हॅक केल्याचा दावा करणाऱ्या सय्यद शुजाविरोधात निवडणूक आयोगाने एफआयआर दाखल केला आहे. ३० नोव्हेंबर रोजी दक्षिण मुंबईतील सायबर पोलिस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

१४ नोव्हेंबरला सय्यद शुजाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. यामध्ये तो महाराष्ट्र निवडणुकीत वापरण्यात येणारे ईव्हीएम हॅक करू शकतो, असा दावा करत होता. ५३ कोटी रुपये दिले तर ६३ जागांचे ईव्हीएम हॅक करू, अशी ऑफरही त्यांनी नेत्यांना दिली होती.

महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ) म्हणाले की, ईव्हीएम हॅकिंगचे दावे निराधार, खोटे आणि अप्रमाणित आहेत.

माझ्याकडे महाराष्ट्रातील २८८ पैकी २८१ जागांवरील ईव्हीएम चे ॲक्सेस असल्याचे शुजाने म्हटले होते



हॅकर शुजाने नेत्यांना निवडणुका जिंकण्याचे आमिष दाखवले होते

महाराष्ट्र निवडणुकीदरम्यान सय्यद शुजा यांनी निवडणूक जिंकण्यासाठी काही नेत्यांशी संपर्क साधला होता. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या तंत्रज्ञानाचा वापर करून तो ईव्हीएम हॅक करू शकतो, असा दावा त्याने केला होता. त्यासाठी तो पैसे घेईल. तो अमेरिकेच्या संरक्षण खात्यात कंत्राटावर काम करत असल्याचेही शुजाने सांगितले होते.

सय्यद शुजा हैदराबाद येथील सायबर सुरक्षा संशोधक आहेत. सध्या तो कॅनडामध्ये आहे. सय्यद शुजा हैदराबाद येथील सायबर सुरक्षा संशोधक आहेत. सध्या तो कॅनडामध्ये आहे.

**शुजाने २०१९ मध्येही हाच दावा केला होता**

सय्यद शुजा यांनी २१ जानेवारी २०१९ रोजी लंडनमध्ये इंडियन जर्नालिस्ट असोसिएशन च्या पत्रकार परिषदेतही असाच दावा केला होता. आपण २००९ ते २०१४ पर्यंत इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड मध्ये काम केल्याचे शुजाने सांगितले होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत वापरण्यात आलेल्या ईव्हीएम मशीन बनवणाऱ्या टीमचा तो एक भाग होता. एका विशिष्ट फ्रिक्वेन्सीचा वापर करून या मशीन्समध्ये छेडछाड केली जाऊ शकते, असे त्याने सांगितले होते.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम हॅक करण्यात आले हाते आणि त्यावरच भाजपने विजय मिळवला होता, असा दावा शुजा याने केला होता. काँग्रेसचे माजी नेते कपिल सिब्बल यांनी या दाव्यांचा मुद्दा बनवून ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित केले होते.

## उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंच्या नावाची चर्चा

**सर्व घडामोडींबाबत आज काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दरेगावातून प्रतिक्रिया देत भाष्य केलं**



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीला बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाला सामोरं जावं लागलं. विधानसभेत मिळालेल्या मोठ्या यशानंतर महायुतीकडून राज्यात सरकार स्थापनेच्या दिशेने पावलं टाकण्यात येत आहेत. पण निकालानंतर आठ दिवस झाले तरीही महायुतीचं सरकार स्थापन होऊ शकलं नाही. सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचाली सुरु आहेत. यातच मुख्यमंत्री पदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार? हे देखील स्पष्ट करण्यात आलेलं नाही. त्यामुळे मुख्यमंत्री पदाबाबत सस्पेंस कायम असल्याचं बोललं जात आहे.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीकडे राज्याचं गृहखातं मागितल्याची चर्चा आहे. यातच शिंदे साताऱ्यातील त्यांच्या दरेगावी आहेत. त्यामुळे ते नाराज असल्याचंही बोललं जात आहे. यातच उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंच्या नावाचीही चर्चा असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, या सर्व घडामोडींबाबत आज काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दरेगावातून प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे. माध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदेंच्या नावाचीही चर्चा आहे? यावर प्रश्न विचारला असता अजून चर्चा सुरु आहेत, असं म्हणत त्यांनी सूचक भाष्य केलं.

## 'लाडक्या बहिणी'ने वर्षात ८ राज्यात सरकार बनवले

**८९% स्ट्रॉइक रेट; दीड लाख कोटींच्या योजना, पक्षांच्या आमदारांमध्ये ३३ टक्यांनी वाढ**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
राजकीय पक्षांना विजयाचा नवा आणि खात्रीचा फॉर्म्युला सापडला आहे. यामध्ये प्रत्येक १० पैकी ९ वेळा विजयाची खात्री आहे. सूत्र आहे निवडणुकीपूर्वी महिलांसाठी 'लाडकी बहीण' सारख्या रोख योजना. महाराष्ट्रातील निवडणुका हे त्याचे ताजे उदाहरण आहे. ५ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप युतीने ४८ पैकी १८ जागा जिंकल्या होत्या, म्हणजे ३७%. 'माझी लाडकी बहीण' योजना राबवून युतीने विधानसभेच्या निवडणुकीत २८८ पैकी १३०, म्हणजे ८०% जागा जिंकल्या. नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या एका वर्षात १३ राज्यांमध्ये निवडणुका झाल्या आहेत. यापैकी ९ मध्ये 'लाडकी बहीण' सारख्या योजना राबविण्यात आल्या किंवा आश्वासन दिले गेले. यापैकी ८ राज्यांमध्ये ही योजना प्रभावी होती. स्ट्राइक रेट ८९%. वाचा संपूर्ण अहवाल.

## उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसणार?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
महायुतीला विधानसभेच्या निवडणुकीमध्ये बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला. विधानसभेत मिळालेल्या मोठ्या यशानंतर महायुतीकडून राज्यात सरकार स्थापनेसाठी हालचाली सुरु आहेत. मात्र, निकाल लागून आठ दिवस झाले तरीही अद्याप सरकार स्थापन होऊ शकलेलं नाही. यातच महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार? मुख्यमंत्री पदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार? याबाबत सस्पेंस कायम असल्याचं बोललं जात आहे. तसेच काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पद सोडल्याची भूमिका आधीच पत्रकार परिषदेत जाहीर केलेली आहे. पण एकनाथ शिंदे यांनी महायुतीकडे राज्याचं गृहखातं मागितल्याची चर्चा आहे. मात्र, गृहखातं देण्यास भाजपाचा विरोध असल्याचं बोललं जात आहे.

## मुंबईत २६ वर्षीय महिलेला डिजीटल अटक

**मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी चौकशीसाठी हॉटेल बुक करून रु. १.७ लाख वसूल केले**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
मुंबईत एका महिलेला डिजिटल पद्धतीने अटक करण्यात आली आणि व्हिडिओ कॉलवर तिचे कपडे काढायला लावले. औषध कंपनीत काम करणाऱ्या महिलेसमोर या गुंडांनी दिल्ली पोलिस अधिकारी असल्याची ओळख दिली. आरोपीने महिलेला सांगितले की, जेट एअरवेजचे संस्थापक-अध्यक्ष नरेश गोयल यांच्याशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात तिचे नाव समोर आले आहे. गोयल सध्या तुरुंगात आहेत. यानंतर गुंडांनी महिलेकडून १.७ लाख रुपये वसूल केले.

**चौकशीसाठी हॉटेलची खोली बुक केली**

मुंबईत राहणाऱ्या २६ वर्षीय महिलेला १९ नोव्हेंबरला गुंडांनी फोन करून तिचं नाव मनी लॉड्रिंग प्रकरणात आल्याचं सांगितलं. महिलेला त्यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवल्यानंतर ठगांनी व्हॉईस कॉल व्हिडिओ कॉलवर हलवला. यानंतर, महिलेला अधिक चौकशीसाठी हॉटेलच्या खोलीत चेक इन करण्यास सांगितले. हॉटेलमध्ये चेक इन केल्यानंतर गुंडांनी व्हिडिओ कॉलद्वारे महिलेच्या बँक तपशीलांची पडताळणी करण्यासाठी तिला १ लाख ७८ हजार रुपये ट्रान्सफर करण्यास सांगितले. यानंतर गुंडांनी महिलेचे शरीर पडताळणीसाठी तिचे कपडेही काढायला लाव.

आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आल्यानंतर तिने २८ नोव्हेंबर रोजी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत

नरेश गोयल यांच्या नावावर यापूर्वीही फसवणूक झाली होती

यापूर्वी नरेश गोयलच्या नावाने वर्धमान या कापड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पॉल ओसवाल यांनाही ठगांनी डिजिटल पद्धतीने अटक केली होती. त्यांची सात कोटी रुपयांची फसवणूक झाली. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली होती. त्याच्याकडून ५.२५ कोटी रुपये जप्त करण्यात आले. पोलिसांनी या टोळीतील आणखी सात जणांची ओळख पटवली होती.

## सरकार स्थापन होताच प्रवाशांच्या खिशाला झळ?

**'लालपरी'चा प्रवास महागण्याची शक्यता ■ १४ टक्के भाडेवाढीचा शासनाकडे प्रस्ताव**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
राज्यात नवे सरकार स्थापन होताच प्रवाशांच्या खिशाला झळ बसण्याची शक्यता आहे. कारण लालपरीचा प्रवास महागणा आहे. राज्य परिवहन महामंडळाकडून एसटीची १४ ते १५ टक्के भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे देण्यात आला आहे. त्यामुळे लालपरीचा प्रवास महाग होणार आहे. सरकार स्थापन झाल्यावर भाडेवाढीच्या प्रस्तावावर निर्णय घेतला जाईल.

मिळालेल्या माहितीनुसर मागील तीन वर्षांपासून एसटीचे तिकीट दर स्थिर होते. तीन वर्षांपासून तिकीट दरात कोणतीही भाडेवाढ झाली नसल्याचे सांगत परिवहन महामंडळाकडून शासनाकडे भाडेवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे. उत्पन्नाच्या तुलनेत खर्च भागत नसल्याचेही कारण देण्यात आले आहे. ही भाडेवाढ मंजुर झाल्यास प्रवाशांना १०० रुपयांच्या तिकिटावर १५ रुपये जादा मोजावे लागतील. सुरुवातीला परिवहन विभागाने १२.३६ टक्क्यांची किरकोळ वाढ सुचवली होती, मात्र नंतर महामंडळात झालेल्या चर्चेनंतर त्यात सुधारणा करून १४.१३ टक्के करण्यात आली. यापूर्वी २७ नोव्हेंबर २०२१ रोजी लालपरीची भाडेवाढ झाली होती.

**सरकारकडे सवलत मूल्य बाकी**

दरम्यान, एसटी वाचविण्यासाठी सरकारला भाडेवाढीला मंजुरी द्यावी लागेल, महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी म्हटले आहे. सरकारने विविध योजनांच्या सवलतीचे पैसे महामंडळाला दिले नाहीत, असेही ते म्हणाले. एकीकडे सरकार योजनांच्या घोषणा करत सुटले आहे. दुसरीकडे त्या विविध सवलतींचे पूर्ण सवलत मूल्य सरकार देत नाही. दर महिन्याला ३५० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा कमी पैसे दिले जातात. मात्र, उर्वरित पैसे दिले जात नाही. सरकारकडे डिझेलचे १५० कोटी देणे बाकी आहे. वेळ आल्यास डिझेलसाठी गाड्या थांबू शकतात, अशी भीती श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केली आहे.



**भाढेवाढीसाठी विविध कारणे**

गेल्या अनेक दिवसांपासून एसटी महामंडळाला दररोज १५ कोटींच्या आसपास तोटा सहन करावा लागतो. ही तूट भरून काढण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांचे वाढलेले वेतन सुरळीत देण्यासाठी त्यासोबतच इंधनाचा वाढता दर, सुट्ट्या भागांची वाढती किंमत भागविण्यासाठी ही भाडेवाढ आवश्यक असल्याचे सांगण्यात येत आहे.

# पुणे शहरात हेल्मेट सक्तीच्या कारवाईचा तूर्त बडगा नाही

## जानेवारीत अंमलबजावणी करण्याचे पोलीस आयुक्तांचे संकेत

पुणे, दि. १ : प्रतिनिधी



विना हेल्मेट दुचाकीस्वार आणि पाठीमागे बसलेला प्रवासी अशा दोघांवर कारवाई करण्याच्या राज्य सरकारने काढलेल्या आदेशापासून पुणेकरांना तुर्तास दिलासा मिळाला आहे. वाहतुकीबाबत शहरात कार्यरत असलेले विविध विभाग, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी अशा सर्वांची चर्चा करून, हेल्मेटच्या वापराबाबत जनजागृती केल्यानंतर एक जानेवारीपासून कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुरुवारी स्पष्ट केले.

विना हेल्मेट दुचाकीस्वार आणि पाठीमागे बसलेल्या अशा दोघांवर कारवाई करण्याचे आदेश वाहतूक विभागाच्या अपर पोलीस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना दिले होते. आत्तापर्यंत केवळ विना हेल्मेट असलेल्या दुचाकीचालकांवर कारवाई करण्यात येत होती. मात्र, सहप्रवाशावर देखील कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांच्या ई-चलन मशिनमध्ये बदल करण्यात आला आहे. केवळ सहप्रवाशावर कारवाई करण्याची तरतूद त्यात करण्यात आल्याचे महासंचालकांनी काढलेल्या पत्रात नमूद आहे. त्यानुसार काही ठिकाणी कारवाई देखील सुरू करण्यात आली होती. त्याला विविध स्तरांतून विरोध झाल्यामुळे याबाबत समाजातील विविध घटकांशी आणि प्रशासकीय यंत्रणांशी चर्चाकरून जानेवारी महिन्यात कारवाईचा निर्णय घेण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी गुरुवारी दिली.

पुण्यात हेल्मेटसक्ती लागू करण्यात येवू नये, या मागणीसाठी आमदार हेमंत रासने यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेऊन चर्चा केली. दिवसेंदिवस अपघातांची संख्या वाढत असल्याने महामार्गांवरील दुचाकीस्वार आणि सहप्रवाशांसाठी हे आदेश काढण्यात आल्याचे यावेळी आयुक्तांनी रासने यांना सांगितले.

विना हेल्मेट दुचाकीस्वार व सहप्रवासी यांचे अपघात व त्यात मृत्युमुखी तसेच जखमी होणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे राज्यात हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे. मात्र, त्यानंतरही काही दुचाकीचालक हेल्मेटचा वापर करत नसल्याचे दिसून आले आहे. स्वतःच्या सुरक्षेसाठी वाहनचालकांनी नियमित हेल्मेटचा वापर करावा, यासाठी आम्ही जनजागृती करण्यावर भर देणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

# स्थलांतरीत पक्ष्यांची जिल्ह्याकडे यंदाही पाठ

## डोंबिवलीतील मुख्य ठिकाणी मोजक्याच पक्ष्यांची नोंद, वसईत 128 प्रजातींची निरीक्षकांडून नोंद

ठाणे, दि. १ : प्रतिनिधी



वाढते प्रदूषण आणि पक्ष्यांच्या नैसर्गिक अधिवासाच्या आसपास होणारे बांधकाम यामुळे प्रामुख्याने डोंबिवली येथील विविध ठिकाणी येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांची यंदाही संख्या कमीच आढळून आली आहे. नुकत्याच झालेल्या पक्षी सप्ताहाच्या कालावधीत जिल्ह्यातील अनेक पक्षी निरीक्षक या ठिकाणी निरीक्षणासाठी आणि छायाचित्र काढण्यासाठी आवर्जून येत असतात. मात्र यंदा युरोप तसेच देशाच्या उत्तर भागातून स्थलांतर करून येणाऱ्या अनेक पक्ष्यांची येथे अद्याप नोंदच झालेली नाही. तर वसईत काही मोजक्या ठिकाणी स्थलांतरित पक्ष्यांची काही अंशी चांगली नोंद झाली असून काही पक्ष्यांचे पहिल्यांदाच वसईत मुक्काम केल्याची नोंद पक्षी निरीक्षकांडून करण्यात आली आहे.

थंडीची चाहूल लागल्यावर युरोपीय देशांतून स्थलांतर करून आलेले विविध पक्षी डोंबिवलीजवळच्या भोपर, कोपर, उंबार्ली टेकडी, सातपूल या परिसरात आढळतात. या सर्व स्थलांतरित पक्ष्यांचे निरीक्षण करण्यासाठी, छायाचित्रे काढण्यासाठी पक्षीनिरीक्षक आणिअभ्यासक गर्दी करतात. मात्र गेल्या काही वर्षांपासून पक्ष्यांच्या अधिवासाच्या परिसरातील वाढते बांधकाम आणि लोकवस्तीमुळे प्रदूषणात वाढ झाल्याने त्याचा परिणाम पक्ष्यांच्या स्थलांतरावर झाल्याचे दिसून आले आहे. तलवार बदक, थापट्या, चक्रांग, काष्ठ तुतवार, मोठ्या ठिपक्यांचा गरुड, भुवई बदक, छोटा पाणलावा, लाल डोक्याचा रेडवी, करड्या मानेचा रेडवी, पांढुरक्या भोवत्या, कंठेरी चिखल्या यांसारखे पक्षी युरोपातून स्थलांतर करून डोंबिवली परिसरात येतात. मात्र यावर्षी ब्लू टेल बी इटर, थापटया, काही प्रमाणात तलवार बदक, मार्श हॅरियर इत्यादी मोजकेच पक्षी डोंबिवली जवळील भोपर, सातपुल, उंबारली या सारख्या शिल्लक असलेल्या पक्ष्यांच्या अधिवासात आढळून आले आहेत. तर बहुतांश पक्षी निरीक्षक पांढरा करकोचा, रणगोजा तसेच काळा बलाक यांसारख्या पक्ष्यांचे छायाचित्र काढण्यासाठी येत असतात. मात्र यंदाही या पक्ष्यांची अद्याप डोंबिवलीत हजेरी लावलेली नसल्याची माहिती डोंबिवलीतील युवा पक्षी निरीक्षक आणि अभ्यासक अर्णव पटवर्धन यांनी दिली आहे. तसेच अशाच पद्धतीने जर प्रदूषण आणि बांधकाम सुरु राहिले तर डोंबिवलीतील स्थलांतरित पक्ष्यांचे प्रमाण अगदी नाहीच्या बरोबरीला येण्यास वेळ लागणार नाही, अशी प्रतिक्रिया अर्णव पटवर्धन यांनी दिली आहे.

वसईतील विविध भागांमध्ये विविध स्थलांतरित पक्ष्यांचा मुक्काम सध्या दिसून येत आहे. वसईमधील भुईगाव, गोगटे मिठागर, अर्नाळा बीच, तुंगारेश्वर अभियारण्य या ठिकाणी सध्या अनेक स्थलांतरित पक्षी दिसून येत आहेत. यामध्ये सध्या वसई, पालघर येथे काळ्या पोटाचा सुरय हा पक्षी पहिल्यांदाच आढळून आला आहे. तसेच नागालँड येथून येणारे अमूर ससाणे तसेच फ्लेमिंगो देखील सध्या आढळून येत आहेत. मात्र या भागांमध्ये देखील बांधकामाचे प्रमाण वाढू लागल्याने या अधिवासांना देखील भविष्यात धोखा उद्भवू शकतो. यांचे संवर्धन करण्याची गरज असल्याची माहिती ठाण्याचे ज्येष्ठ पक्षी निरीक्षक डॉ. सुधीर गायकवाड यांनी दिले आहेत.

# पनवेलकरांना श्वसनाच्या आजारांचा विळखा प्रदूषणामुळे सर्दी, खोकल्याच्या रुग्णांत वाढ

पनवेल, दि. १ : प्रतिनिधी

थंडीची चाहूल लागताच पनवेलमध्ये ताप, सर्दी, खोकल्याचे रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. वाढलेल्या प्रदूषणामुळे, धुलिकणांच्या त्रासामुळे श्वसनविषयक आजारांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. पालिकेच्या दवाखान्यातून मोफत उपचार केले जात असले तरी खासगी दवाखान्यातील ओघही कमी झालेला नाही. दरम्यान, पालिकेने सर्व दवाखाने आता पूर्णवेळ म्हणजेच सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू ठेवले असल्याचे रुग्णांना दिलासा मिळत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्राजवळ तळोजा परिसरात प्रदूषित कारखाने आणि मोठ्या प्रमाणात दगड खदाणी आहेत. आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम या परिसरात सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात धुलिकण पनवेलच्या हवेमध्ये असल्याने पनवेलच्या दूषित हवेमुळे श्वसनाशी संबंधित आजाराच्यचा रुग्णांची वाढत आहे. पनवेलमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तोंडरे आणि कळंबोली या परिसरात हवेतील गुणवत्ता तपासण्यासाठी यंत्र उभारले आहे. तळोजा परिसरातील तोंडरे गावातील या यंत्रातून हवेतील गुणवत्ता पी.एम. २.५ चा स्तर ११४ पर्यंत नोंदविला जात आहे. मागील वर्षभरात पालिकेच्या विविध दवाखान्यांमध्ये सात दिवसांपेक्षा कमी वेळेपर्यंत ताप राहीलेल्या १८,४९१ रुग्णांची नोंद झाली. तर सात दिवसांपेक्षा अधिक दिवस ताप असलेल्या रुग्णांची संख्या ३,३२८ एवढी नोंदविली गेली. तसेच मागील वर्षभरात सात दिवसांपेक्षा कमी काळ खोकला असलेल्या रुग्णांची संख्या ११,२६४ होती तर सात दिवसांपेक्षा अधिक काळ खोकला असल्या रुग्णांची संख्या ४,२८६ नोंदविली गेली.

मागील वर्षीपेक्षा यावेळी पालिका क्षेत्रात पालिकेच्या दवाखान्यांची संख्या २६ वर पोहचली आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, ताप यांसारख्या आजारांवर उपचार घेणा-या रुग्णांची संख्या दुप्पटीने वाढली आहे. हे वर्ष संपण्यासाठी अजून महिना शिल्लक असेपर्यंत पालिकेच्या २६ विविध दवाखान्यांमध्ये आजारावरील उपचारासाठी येणा-या रुग्णांची संख्या ५,३८,९९० वर पोहचली आहे. मागील वर्षी ३,०८, ३६८ रुग्णांनी पालिकेच्या दवाखान्यात उपचार घेतले होते. वाढलेल्या रुग्णसंख्येमुळे यंदा ताप, सर्दी, खोकल्याचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आतापर्यंत नोंदविले गेले आहेत. यावेळी सात दिवसांपेक्षा कमी दिवस ताप असलेले रुग्ण मागील वर्षीपेक्षा दुप्पटीने जास्त आढळले आहेत. यंदा ३८,१५८ रुग्णांची नोंद झाली आहे. तसेच सात दिवसांपेक्षा अधिक काळ ताप असलेल्या रुग्णांची संख्या ५,०८० नोंदविली गेली आहे. तसेच यंदा सात दिवसांपेक्षा कमी दिवस खोकला असलेले रुग्ण १७,३५१ तर सात दिवसांपेक्षा अधिक काळ खोकला असलेले रुग्ण ३,६५३ एवढे आढळले आहेत.

दरम्यान, पनवेल पालिकेच्या आरोग्य विभागाने यापूर्वी साथरोगापासून बचाव करण्यासाठी वेळोवेळी घरोघरी जनजागृतीची पत्रके वाटली आहेत. संसर्ग आजार असलेल्या रुग्णांनी प्रवास टाळणे, गर्दी टाळणे, सतत हात धुणे, ताजे घरातील अन्न खावे ही त्रिसूत्री पाळण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

> ताप, सर्दी, खोकला या रुग्णांची संख्या वाढल्याचे पालिकेच्या २६ दवाखान्यांमध्ये नोंदविले गेले असले तरी हे सर्व दवाखाने पुर्णवेळ सूरु असल्याने यामध्ये रुग्णांचा उपचार घेणा-या रुग्णांचा ओघ वाढल्याने ही संख्या जास्त वाटत असेल. रुग्णांनी प्रवासावेळी मुखपट्टी बांधल्यास ते योग्य राहील. सर्दी, खोकला व ताप असलेल्या रुग्णांनी पालिकेने प्रत्येक वसाहतीमध्ये तसेच ग्रामीण भागात सुद्धा पालिकेचे दवाखाने सुरू केले आहेत. दोन पाळयांमध्ये तेथे डॉक्टर व आरोग्यसेविका उपलब्ध आहेत. येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा.
>
> **-डॉ. आनंद गोसावी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल पालिका**

# बेपत्ता मुले-महिलांच्या शोधासाठी राज्यात ऑपरेशन 'मुस्कान मोहीम'

पुणे, दि. १ : प्रतिनिधी

राज्याच्या वेगवेगळ्या शहरातून बेपत्ता झालेली मुले, तसेच महिलांच्या शोधासाठी पोलिसांकडून 'ऑपरेशम मुस्कान – १३' ही विशेष मोहीम १ ते ३० डिसेंबर या कालावधीत राबविली जाणआर आहे.या मोहिमेच्या अनुषंगाने पुणे पोलिसांच्याअनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, तसेच सर्व पोलीस ठाण्यांमध्ये विशेष पथकाची स्थापना करण्यात येणार आहे.

या पथकाच्या माध्यमातून शहरातील सर्व पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात येणार आहे. पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एक सहायक निरीक्षक, तीन पोलीस कर्मचाऱ्यांचा या पथकात समावेश राहणार आहे. या मोहिमेतंर्गत पुणे शहर, तसेच परिसरातून बेपत्ता झालेली मुले, तसेच तरुणींचा शोध घेण्यात येणार आहे.

'ऑपरेशन मुस्कान – १३ ' ही राज्यभरातील अल्पवयीन मुले आणि १८ वर्षावरील महिलांचा शोध घेण्यासाठी हाबविण्यात आलेला एक प्रभावी उपक्रम आहे. पुणे शहरातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. एरवी शहरातून बेपत्ता झालेली लहान मुले, महिलांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात येतात. बेपत्ता झालेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी २४ तास आणि ३६५ दिवस प्राधान्य देण्यात आले आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

# शाळकरी मुलाच्या डोक्यात दगड मारुन खुनाचा प्रयत्न अल्पवयीनांविरुद्ध गुन्हा दाखल

पुणे, दि. १ : प्रतिनिधी

नात्यातील मुलीबाबत अपशब्द वापरल्याने अल्पवयीनांनी शाळकरी मुलाच्या डोक्यात दगड मारल्याची घटना कोंढवा भागात घडली. याप्रकरणी तीन अल्पवयीनांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत मुलाच्या वडिलांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. १५वर्षीय मुलगा कोंढव्यातील टिळेकरनगर भागात राहायला आहे. मुलाने शाळेतील एका मुलीबाबत अपशब्द उच्चारल्याने अल्पवयीन मुले चिडली होती. बुधवारी सकाळी आठच्या सुमारास तो शाळेत निघाल होता. टिळेकरनगर परिसरातील आकृती सोसायटीजवळ तीन अल्पवयीनांनी मुलाला अडवले. त्याला शिवीगाळ करुन मारहाण केली. एकाने शाळकरी मुलाच्या डोक्यात दगड मारल्याने त्याला गंभीर दुखापत झाली. मारहाण करुन अल्पवयीन पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या मुलाला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, पोलीस उपनिरीक्षक पूजा पाटील तपास करत आहेत.

**किरकोळ वादातून गंभीर गुन्हे**

अल्पवयीनांमधील किरकोळ वादातून गंभीर गुन्हे घडतात. आठवड्यापूर्वी हडपसर भागातील एका शाळेत वार्षिक समारंभातील वादातून एका वर्गमित्राचा काचेच्या तुकड्याने गळा चिरल्याची घटना घडली होती. या घटनेत मुलगा गंभीर जखमी झाला होता. वर्षभरापूर्वी भवानी पेठेतील एका शाळेच्या आवारात वादातून शाळकरी मुलावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आले होते.

# कौटुंबिक न्यायालयात बालदिन उत्साहात साजरा

नवी मुंबई, दि. : प्रतिनिधी

कौटुंबिक न्यायालय, मुंबई आणि मुंबई उपनगर विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने बालदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन कौटुंबिक न्यायालयात करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कौटुंबिक न्यायालय, मुंबईच्या प्रमुख न्यायाधीश मंगला ठाकरे आणि मुंबई उपनगर विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सतीश हिवाळे साहेब उपस्थित होते. विवाह समुपदेशक सुषमा बिडवे आणि संजीवनी आरवेल यांनी कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडली. तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने तसेच मुस्कान संस्थेच्या श्रीमती गायत्री यांच्या सहभागाने बालदिनाचा हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

कौटुंबिक न्याायालयात बालक आणि पालक यांच्या भेटीच्या खोलीला बालसंकुल नाव आहे. बालदिन कार्यक्रमासाठी बालसंकुल आकर्षक सजावट करून सजविण्यात आले होते.ज्यामुळे मुलांना प्रसन्न आणि आनंददायी वातावरण अनुभवता आले. मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी हस्तकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत मुलांसोबत पालकांनाही सहभाग घेता आला. हस्तकला प्रशिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली विविध कलाकुसरीच्या वस्तू तयार करण्यात आल्या, ज्यामुळे उपस्थित सर्व मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. मुलांसाठी खेळ आणि गाण्यांचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता, त्यामुळे बालसंकुलातील वातावरण उत्साहपूर्ण झाले. मुलांनी खाऊ आणि चॉकलेट चा आनंद घेतला.

# ठाण्यात अल्पवयीन मुली वेश्याव्यवसात

ठाणे, दि. १ : प्रतिनिधी

शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी महिला आणि अल्पवयीन मुलींना फूस लावून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तिघांना अटक केली आहे. अटकेत असलेल्यांमध्ये दोन महिलांचा सामावेश आहे. पोलिसांनी त्यांच्या तावडीतून एक अल्पवयीन मुलगी आणि आठ महिलांची सुटका केली आहे.

रईसा खान (४६), जोया शेख (२५) आणि युनीस शेख (४५) अशी अटकेत असलेल्यांची नावे आहेत. ठाणे शहरात महिलांना आणि अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडे प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांनी गुरुवारी सायंकाळी उथळसर परिसरातील एका हॉटेलमध्ये बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. त्यावेळी पोलिसांनी रईसा, जोया आणि युनीस या तिघांना रंगेहात पकडले.

याप्रकरणात पोलिसांनी त्यांच्या तावडीतून अल्पवयीन मुलगी आणि आठ महिलांची सुटका केली आहे. याप्रकरणी रईसा, जोया आणि युनीस या तिघांविरोधात राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.

# नवी मुंबईत 26 ठिकाणी हिवताप / डेंग्यू विषयक जनजागृती शिबीरांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद

नवी मुंबई, दि. १ : प्रतिनिधी

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप /डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 26 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात आयोजित जनजागृतीपर विशेष आरोग्य शिबीरांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. आज 26 ठिकाणी आयोजित शिबिरांना 13533 नागरिकांनी भेट दिली असून 1312 रक्त नमुने घेण्यात आले आहेत. या शिबिरांच्या ठिकाणी ॲनॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात मॉडलव्दारे दाखवून, तसेच नागरिकांना डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून, घराभोवती व घरांतर्गत असणारी संभाव्य डासोत्पत्ती स्थाने दाखविण्यात आली. यामध्ये पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याचप्रमाणे पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस



स्वच्छ करुन कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य व टायर्स इ. नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शीट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे, ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले तसेच याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन करण्यात आले. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राची भौगोलिक रचना लक्षात घेता नागरी वस्तीलगत असणारा खाडी किनारा व त्याठिकाणचा दलदलीचा परिसर यामध्ये हिवाळा कालावधीत क्युलेक्स डासांची घनता वाढण्याकरिता पोषक वातावरण असल्याने या कालावधीत इतर कालावधीपेक्षा जास्त डास प्रादुर्भाव जाणवतो. परिणामी सदर कार्याक्षेत्रालगतच्या नागरी वस्तीमधून डास प्रादुर्भावाच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असतात. यामुळे दि.25/11/2024 ते 22/2/2025 या कालावधीत नागरिकांना डासांचा जास्त त्रास जाणवू नये या उद्देशाने आयुक्त महोदयांच्या निर्देश आहे.

# आज सनातन संस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा

पणजी, दि. १ : प्रतिनिधी

गोवा राज्यात स्थापन झालेल्या आणि सध्या संपूर्ण भारतात सनातन हिंदु धर्माचा तेजस्वी प्रचार करणाऱ्या सनातन संस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा ३० नोव्हेंबर या दिवशी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा अमृत महोत्सवी सन्मान गोव्याचे मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत यांच्या शुभहस्ते केला जाणार आहे. या सोहळ्याला केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, गोव्याचे पर्यटनमंत्री रोहन खंवटे आणि भाजपचे गोवा प्रदेशाध्यक्ष तथा खासदार श्री. सदानंद तानावडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ यांचीही या कार्यक्रमाला वंदनीय उपस्थिती सोहळ्याला असणार आहे. या कार्यक्रमात अमृत महोत्सवी सन्मानानिमित्त प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचे होणारे मार्गदर्शन म्हणजे गोमंतकियांसाठी अमूल्य पर्वणीच आहे. या अमूल्य अशा क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी गोमंतकियांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी पणजी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले. या पत्रकार परिषदेला 'गीता परिवार'चे महासचिव श्री. सुभाष नाईक आणि 'सनातन संस्थे'च्या सौ. शुभा सावंत यांचीही उपस्थिती होती. सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवाविषयी अधिक माहिती देतांना श्री. राजहंस पुढे म्हणाले, ''सनातन संस्था ही आध्यात्मिक संस्था असून तिचे सर्व उपक्रम समाजाचे आध्यात्मिक कल्याण साध्य करणारे आहेत. सनातन संस्थेची २५ वर्षे म्हणजे समाजाच्या आध्यात्मिक सेवेची २५ वर्षे आहेत. सनातन धर्मातील अध्यात्म हे विज्ञान म्हणून अर्थात् 'अध्यात्मशास्त्र' म्हणून प्रस्थापित करण्यासाठी सनातन संस्थेने मोठे कार्य केले. अध्यात्मशास्त्रावरील सनातनची ग्रंथसंपदा आणि सनातन शिकवत असलेली 'गुरुकृपायोगानुसार साधना' यांमुळे आज १२२ साधक संत झाले असून १ हजारांहून अधिक साधकांचा प्रवास संतत्वाच्या दिशेने होत आहे. सनातन संस्थेच्या मार्गदर्शनामुळे हजारो लोक आज तणावमुक्त, व्यसनमुक्त आणि आनंदी जीवन जगत आहेत. रौप्य महोत्सवानिमित्त संस्थेने समाजातील सर्व घटकांसाठी निशुल्क तणावमुक्त आणि व्यसनमुक्त जीवनासाठी कार्यशाळा आयोजित केल्या. अशा सनातन संस्थेचा रौप्य महोत्सव आणि प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा अमृत महोत्सव म्हणजे दुग्धशर्करायोगच आहे.''

# विमानतळ बाधितांच्या आंदोलनाला 55 दिवस पूर्ण सरकार आणि सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष

उरण, दि. १ : प्रतिनिधी

वारंवार आंदोलन अर्ज, चर्चा करूनही नवी मुंबई विमानतळ बाधितांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने ७ ऑक्टोबरपासून प्रकल्पग्रस्तांनी सिडको कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला ५५ दिवस पूर्ण झाले आहेत. मात्र त्यानंतरही आंदोलन सुरू असून नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर चर्चा होण्याची अपेक्षा भूमिपुत्रांना आहे.

नवी मुंबई विमानतळ पूर्णत्वास जात आहे. येत्या एप्रिल २०२५ पर्यंत ते कार्यान्वित होणार आहे. मात्र या विमानतळासाठी आपले सर्वस्व असलेल्या जमिनी आणि राहती घरे देणाऱ्या भूमिपुत्रांचे पुनर्वसन अपूर्ण आहे. यासंदर्भात १ जुलैला पनवेल ते मुंबई मंत्रालय असा पायी लाँग मार्च काढला होता. त्यावेळी राज्याचे तत्कालीन मंत्री शंभुराज देसाई यांच्यासोबत चर्चा झाली, मात्र त्यानंतर कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्याने ७ ऑक्टोबरपासून प्रकल्पबाधितांनी आंदोलन सुरू केले आहे. आपल्या मागणीसाठी हे प्रकल्पग्रस्त गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने लढत आहेत. तरीही राज्य सरकार सिडको प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. त्यांचे पूर्ण आणि कायद्याच्या चौकटीत योग्य पुनर्वसनाच्या मागणीसाठी नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ समिती आणि अखिल भारतीय किसान सभा यांच्या संयुक्त विद्यमाने हे बेमुदत आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

# नागपूर स्मार्ट सिटीचे ट्रॅफिक पोलीस बूथ पोलिसांसाठी वरदान

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

नागरिकांच्या सेवेत अहोरात्र तत्पर राहणाऱ्या नागपूर पोलिसांसाठी नागपूर स्मार्ट सिटीचे ट्रॅफिक पोलिस बूथ पोलिसांसाठी वरदान ठरत आहेत. नागपूर स्मार्ट अँन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे शहरातील विविध ठिकाणी ७८ ट्रॅफिक पोलिस बूथ तैनात करण्यात आले आहेत. यामुळे नागपूर वाहतूक पोलिसांना नागपुरातील कडाक्याची थंडी, पाऊस आणि उष्णतेच्या तीव्रतेपासून संरक्षण मिळत आहे.

शहराच्या प्रगतीसाठी नागपूर स्मार्ट सिटीकडून अनेक महत्वाच्या योजना राबविण्यात येत आहेत. नागपूर स्मार्ट सिटी उपक्रमांतर्गत शहरात पायाभूत सोयी सुविधा आणि सार्वजनिक सेवा सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊले उचलली जात आहेत, ज्याचा उद्देश नागरिकांचे जीवनमानात सुधारणे आणि पर्यावरणास अधिक कार्यक्षम बनवणे आहे. या उपक्रमांतर्गत वाहतूक पोलिस बूथसारखा एक महत्त्वाचा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे.




नागपूर स्मार्ट सिटीतर्फे शहरातील विविध चौकांमध्ये ७८ सौर ऊर्जेवर चालणारे ट्रॅफिक पोलिस बूथ लावण्यात आले आहेत.

या बूथमुळे पोलिसांना निवाऱ्यासह चौकातील वाहतूक प्रभावीपणे सांभाळण्यासाठी मदत मिळत आहे, तसेच त्यांना कडाक्याची थंडी, तीव्र उन्हाळा, मुसळधार पावसापासून संरक्षण देण्यासाठी देखील या बूथ चा वापर होत आहे. ट्रॅफिक पोलीस बूथमध्ये सोलर पॅनेल्स, पंखा, फर्स्ट-एड बॉक्स, अग्निशामक यंत्र, आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी, मायक्रोफोन, आणि बायोमेट्रिक प्रवेशद्वार अशा सुविधा उपलब्ध आहेत. ट्रॅफिक पोलिसांकडे वॉकिटॉकीस असतात, ज्याद्वारे ते वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सतत संपर्क साधू शकतात.

याशिवाय, शहरभर विविध ठिकाणी कॅमेरे बसवलेले आहेत, ज्यामुळे वरिष्ठ अधिकारी ट्रॅफिक स्थितीचे प्रत्यक्ष निरीक्षण करू शकतात आणि पोलिसांना आवश्यक ते मार्गदर्शन करू शकतात. हे सेटअप विविध रॅली, मोठ्या कार्यक्रमांमध्ये, आणि आपत्कालीन परिस्थितींमध्ये अत्यंत उपयुक्त ठरत आहे, असे नागपूर स्मार्ट सिटीचे, जनरल मॅनेजर, ई-गव्हर्नन्स डिपार्टमेंट डॉ. शील घुले यांनी सांगितले.

नागपूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, "स्मार्ट ट्रॅफिक बूथ ट्रॅफिक व्यवस्थापन आणि पोलिसांच्या सोयीच्या दृष्टीने तयार करण्यात आले आहेत. पोलिसांना उष्णता, पावसात आणि थंडीत सह वातावरणातील बदलांचा सामना करावा लागतो. हे बूथ त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवून एका अनुकूल वातावरणात ट्रॅफिक व्यवस्थापनाची सोय प्रदान करते, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते"

नागपूर वाहतूक पोलीस उपायुक्त आर्चित चांडक म्हणाले की, "हे ट्रॅफिक पोलिस बूथ पोलिसांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले आहेत, विशेषतः उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळ्यात याचा फायदा झाला आहे. पोलिसांना व्हॉयस सिस्टमचा वापर करून ट्रॅफिक व्यवस्थापन करता येत असल्याने "स्मार्ट पोलिसिंगला" चालना मिळते आहे.

पोलिस कॉन्स्टेबल पूजा त्रिपाठी म्हणाल्या, "या स्मार्ट ट्रॅफिक बूथमूळे आम्हाला सतर्क राहण्यास मदत होत आहे. वाहतुकीच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून त्वरित प्रतिसाद देणे शक्य झाले आहे. तर कॉन्स्टेबल गणेश शेळके म्हणाले, "नागपूरमध्ये उन्हाळ्यात खूप उष्णता असते आणि अनेक वेळा काही पोलिसांना उष्माघाताचा त्रास होत असतो. हे स्मार्ट बूथ त्यांच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहेत.

वाहतूक बूथमुळे काही अंतरावरून वाहतुकीचा स्पष्ट दृष्टिकोन मिळतो. यामुळे आम्हाला वाहतूक उल्लंघन आणि अपघात सहजपणे ओळखता येतात, ज्यामुळे परिस्थिती नियंत्रणात येण्यापूर्वी आम्ही त्वरित कारवाई करू शकतो. बूथमधून आम्ही सायकलस्वारांना झेब्रा क्रॉसिंग मागे राहण्याची सूचना करू शकतो आणि पादचाऱ्यांना फूटपाथवर चालण्यासाठी सांगू शकतो, ज्यामुळे त्यांची सुरक्षा प्राधान्याने राखली जाते. मायक्रोफोनच्या साहाय्याने, आम्ही वाहन चालकांचे सतत निरीक्षण करतो, त्यांना वाहतूक नियम पाळण्याची आठवण करून देतो. आम्ही हेल्मेट वापर, रस्ता सुरक्षा आणि हळूहळू ड्रायव्हिंगचे महत्त्व याबद्दल घोषणा देखील करू शकतो–तेही बूथ मध्ये राहून. हा प्रणाली वाहतूक व्यवस्थापन अधिक कार्यक्षम आणि व्यवस्थापनीय बनवते, अशी भावना वाहतूक पोलीस ट्रॅफिक कांस्टेबल यांनी व्यक्त केली.

# ग्राहकांच्या नावाने घेतले बँकेतून कर्ज

## मोबाईल शॉपी संचालकांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

दुकानात येणाऱ्या ग्राहकांना हफ्त्यावर मोबाईल मिळवून देण्याचे आमिष दाखवून बंटी-बबली आणि त्यांचा साथीदार कागदपत्रे गोळा करायचे. त्या कागदपत्रांच्या आधारावर बँकेतून वैयक्तिक कर्ज आणि मोबाईल फायनांस करून घ्यायचे. आरोपींनी अशाप्रकारे 40 जणांच्या नावावर एकूण 55 लाख रुपयांचे कर्ज घेतले.

हफ्ते थकल्याने पीडितांना फसवणूक झाल्याचे समजले आणि धंतोली पोलिसात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी किरण सतीश पाटील (33) रा. चिंतामणनगर, दाभाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. कृष्णा गुप्ता, रविना कृष्णा गुप्ता उर्फ जोतवानी आणि अमित जैन अशी आरोपींची नावे आहेत.

आरोपींची झासी राणी चौकात जय माता दी आणि सेल्यूलर लाईफ स्टाईल नावाने मोबाईल शॉपी आहे. बहुतांश मध्यमवर्गीय कुटुंब मोबाईल किंवा इतर कोणतेही उपकरण खरेदी करायचे असेल तर हफ्त्यांवरच घेतात. आरोपींनी याच गोष्टीचा फायदा घेतला. जेव्हा ग्राहक त्यांच्या शॉपीमध्ये मोबाईल खरेदी करण्यासाठी यायचे तेव्हा ते सुलभ हफ्त्यांवर मोबाईल मिळवून देण्याचे आमिष दाखवत त्यांच्याकडून कागदपत्र घेत होते. 20 हजार रुपयांचा मोबाईल खरेदी करणाऱ्याच्या नावावर एक लाख रुपयांचे कर्ज घेत होते. निश्चित रकमेपेक्षा अधिक रक्कम खात्यात जमा झाल्यावर ग्राहक आरोपींशी संपर्क करायचे. तेव्हा दिशाभूल करून आरोपी उर्वरित रक्कम स्वतःच्या खात्यात वळते करण्यास सांगत होते. अशाप्रकारे आरोपींनी अनेकांना चुना लावला. बँकेचे हफ्ते थकल्याने पीडितांनी वसुलीसाठी फोन करण्यास सुरूवात केल्यानंतर ग्राहकांना फसवणूक झाल्याचे समजले.

आरोपींकडून फसवणूक झालेले लोक एक-एक करून धंतोली ठाण्यात तक्रार करण्यासाठी येऊ लागले. धंतोलीच्या ठाणेदार अनामिका मिझापुरे यांनी सांगितले की, आतापर्यंत 40 जणांनी आरोपींविरुद्ध तक्रार केली आहे. त्यांना जवळपास 55 लाखांचा चुना लावण्यात आला आहे. आरोपींची संख्या वाढण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली आहे. आरोपींमुळे अनेकांना मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यांचे सिबील स्कोअरही खराब झाले आहे, कारण बँकेत जमा कागदपत्रांनुसार कर्ज त्यांनीच घेतले आहे. आता तक्रारीनंतर पीडितांची संख्या आणखी वाढू शकते. सध्या आरोपींवर गुन्हा नोंदविण्यात आला असून लवकरच त्यांना अटक केली जाईल.

# मागे बसलेल्यांना हेल्मेटसक्ती शिथिल करा



## भाजयुमोची पोलिस उपायुक्तांना मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

दुचाकीवर मागे बसलेल्यावरील हेल्मेटसक्ती रद्द अथवा शिथिल करावी, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाच्या शिष्टमंडळाने आज वाहतूक पोलिस उपायुक्त अर्चित चांडक यांना केली. भारतीय जनता युवा मोर्चाच्या महाराष्ट्र सरचिटणीस शिवानी दाणी वखरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात मध्य नागपूर अध्यक्ष अक्षय ठवकर, श्रीकांत आगलावे, दीपांशू लिंगायत व इतर पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

महाराष्ट्र राज्यातील मागील ५ वर्षातील रस्ते अपघाताचे प्रमाण नक्कीच वाढले वाढले आहे. त्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यात चालकांनी हेल्मेट घालणे आवश्यक आहे व ते नियमातही आहे. या कायद्यानुसार मागे बसलेल्या व्यक्तीलादेखील हेल्मेट सक्ती करण्यात आल्याने नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागणार आहे. हेल्मेट सक्ती रद्द करावी किंवा याचे नियम शिथिल करण्यात यावे किंवा दोन्ही प्रवाशांनी हेल्मेट घालणे हा नियम महामार्गावर प्रवास करताना उपयोगात आणावा, अशी विनंती पोलिस उपायुक्तांना करण्यात आली.

दुचाकी चालक व मागे बसलेल्या हेल्मेट घालण्याचा नियम जुनाच आहे. शेवटी प्रश्न सुरक्षेचा आहे. त्यामुळे मागे बसलेल्यानेही हेल्मेट घालावे. असे असले तरी एकदम कारवाई न करता सध्या जनजागृतीवर भर दिला जात असल्याचे उपायुक्त अर्चित चांडक यांनी स्पष्ट केले.

# अटल इन्होवेशनमध्ये पं. बच्छराज व्यास विद्यालयाचे सुयश

**नागपूर :** अटल टिंकरिंग लॅब आणि विद्या भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयआयटी दिल्ली येथे राष्ट्रीय पातळीवर एटीएल इनोव्हेशन एक्झिबिशन टेचाथॉन २०२४ चे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये देशभरातून निवडक १०० प्रतिकृतींचे सादरीकरण करण्यात आले होते. द्वितीय पारितोषिक पं. बच्छराज व्यास विद्यालयाच्या इयत्ता ७ वीतील विद्यार्थी अर्णव घाटोळे याला प्राप्त झाले. शाळेतील विज्ञान शिक्षक गिरीश सोनबरसे यांनी त्याला मार्गदर्शन केले. त्याबद्दल भारतीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष गजानन पिलपिले, सचिव ॲड. उपेंद्र जोशी, शाळेच्या मुख्याध्यापिका रेणुका खळतकर, उपमुख्याध्यापिका तिजारे, पर्यवेक्षिका मोहरील यांनी अभिनंदन केले.

# नागपूरच्या ग्रामीण भागात पायाभूत शाश्वत बायोमासचे एकत्रीकरण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

भारतातल्या ग्रामीण भागात शाश्वत बायोमास एकत्रीकरण निर्माणसाठी बायोएनर्जी पुरवठा साखळीतील आघाडीची डिजिटल प्लॅटफॉर्म बायोफ्यूल सर्कल आपल्या कार्यक्षमतेचा विस्तार करत आहे. कंपनीने नागपूर जिल्ह्यातील मौदा जवळच्या तारसा आणि मुझबी गावांमध्ये तीन नवीन वेअरहाऊस सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये दोन वेअरहाऊस तारसा आणि एक वेअरहाऊस मुझबीमध्ये असणार आहे.

ही वेअरहाऊस स्लॅशर्स, बॅलर्स, रेकर्स सारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज असतील. त्यामुळे कंपनीची साठवणूक क्षमता 20,000 मेट्रिक टनांनी वाढणार आहे. या वेअर हाऊसची कामे जानेवारीच्या 2025 अखेरपर्यंत पूर्ण होतील. यामुळे शेतकऱ्यांना शेतातील कुटार, तण जाळण्याच्या समस्येवर मात करता येईल. सोबतच कुटार आणि तणाचे वेळोवेळी नियोजन करून स्थानिक शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाच्या नवीन संधी निर्माण होतील.

शेतकऱ्यांना त्यांचे पीक अवशेष प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यात सहाय्य करण्यासाठी, बायोफ्यूल सर्कलच्या डिजिटल प्लॅटफॉर्मने आणि टेलीमॅटिक्स आधारित ॲप्स तयार केले आहेत. ज्यामुळे धानाच्या कुटाराचे संकलन आणि परिवहनासाठी एक प्रभावी प्रणाली निर्माण होईल. यामुळे राज्यातील ग्रामीण बायोमास व्यवसाय तयार करण्यास मदत होईल. कंपनीने बॅलर्स सारख्या प्रगत डिजिटल एकत्रित यंत्रही कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्याद्वारे तण एकत्र करून त्यवर प्रक्रिया केली जाईल. बायोफ्यूल सर्कलच्या या प्रयत्नाद्वारे एक ग्रामीण अर्थव्यवस्था निर्माण करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, तसेच पर्यावरणाची शुद्धता राखणे हे उद्दीष्ट आहे.

स्थानिक शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी बायोफ्यूल सर्कलने जिल्ह्यातील तारसा भागात जागरूकता मोहीम सुरू केली आहे. या रोड शोचे उद्घाटन तारसा गावच्या सरपंचानी केले. यात स्थानिक शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. शेतकऱ्यांना धानाचे पऱ्हांना एकत्रीकरणाच्या प्रभावी पद्धतीतून आर्थिक फायदे शिकवलल्या गेले. एका दिवसात 100 हून अधिक शेतकऱ्यांनी बायोफ्यूल सर्कलमध्ये सामील होऊन एकत्रीकरण प्रक्रियेची माहिती मिळवली.

बायोफ्यूल सर्कलचा "बायोमास बँक" उपक्रम या प्रयत्नांमध्ये केंद्रीय भूमिका बजावतो. या बँकेद्वारे शेतकऱ्यांना त्यांचे धानाचे कुटार विकण्यासाठी एक सुरक्षित आणि पारदर्शक प्लॅटफॉर्म उपलब्ध केला जात आहे. एकत्र केलेले धानाचे कुटार बायोफ्यूल आणि इतर बायो-आधारित उत्पादकांमध्ये रूपांतरित केले जातात. ज्यामुळे शेतकऱ्यांना एक निश्चित उत्पन्न मिळते आणि तण जाळण्याच्या पर्यावरणीय समस्येवर उपाय सुचवला जातो. सध्या कंपनीकडे 31 गोदामे आहेत आणि येत्या वर्षी उत्तर प्रदेश, हरियाणा, महाराष्ट्र, गुजरात, आणि आंध्र प्रदेश यासारख्या महत्त्वाच्या कृषी राज्यांमध्ये त्याची संख्या दुपटीने वाढवण्याची योजना आहे.

बायोफ्यूल सर्कलचे सह-संस्थापक आणि सीईओ सुहास बक्षी म्हणाले, "आम्ही एक सहभागात्मक पर्यावरण निर्माण करत आहोत. ज्यामुळे ग्रामीण समुदाय आपली आर्थिक क्षमता वाढ चालवू शकतील.

# निधन

## मिनाक्षी वसूले



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

सावरगाव वार्ड नंबर 6 येथील मीनाक्षी गणेश वसूले (50) यांचे काल रात्री 10:30 वाजता निधन झाले. त्यांच्यावर आज दुपारी 12:00 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पाठीमागे बराचमोठा आप्तपरिवार आहे.

# प्रांत उपभोक्ता (ग्राहक) संरक्षण परिषद समिती विदर्भ अध्यक्षपदी हितेश सिंग यांची नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

जागो ग्राहक जागो चा नारा देत संपूर्ण भारतभर ग्राहकांच्या अधिकाराचे जतन करण्याचे कार्य करणाऱ्या प्रांत ग्राहक संरक्षण परिषद समितीच्या विदर्भ अध्यक्षपदी हितेश यादवेंद्र सिंग यांची नियुक्ती पत्र देवून नियुक्ती करण्यात आली.

भारत सरकार द्वारा मान्यता प्राप्त असणाऱ्या प्रांत ग्राहक संरक्षण परिषदेच्या विदर्भ अध्यक्षपदी सामाजीक कार्यात अग्रेसर असणारे व सामाजिक चळवळीत सहभाग नोंदविणारे हितेश सिंग यांची नियुक्ती परिषेदेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश भोसले यांच्या उपस्थिती




नियुक्ती पत्र देवून करण्यात आली आहे. ग्राहकांची होणारी फसवणूक व पिळवणूक टाळण्यासाठी ग्राहाकांना त्यांच्या अधिकाराची जाणीव जागृती करण्याचे काम करण्याचे कार्य प्रांत च्या माध्यमातून संपुर्ण विदर्भ विभागात करणार असल्याचेही सिंग यांनी निवडी नंतर बोलतं असताना सांगीतली. त्यावेळी उपस्थित राजेश भोसले, संदीप सोनी,जीतेंद्र सिंग ,शेखर झलकी आदि उपस्थित होते.

# राज्यात ग्राहकांचे वीज देयक झाले कमी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला राज्यात सर्वाधिक प्रतिसाद नागपूर जिल्ह्यात असून या योजनेतून राज्यभरात ६५ हजारांवर वीज निर्मिती संच कार्यान्वित झाले आहेत. त्यामुळे राज्यातील सौर वीज निर्मितीची क्षमता आता २६०.७५ मेगावॉटने वाढली आहे. या योजनेमुळे ग्राहकांचे वीज देयक कमी झाले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली होती. २७ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यातील ६५ हजार ७६० नागरिकांच्या घरी सौर ऊर्जा निर्मिती संच कार्यान्वित झाले. या संचांमुळे राज्याची वीज निर्मिती क्षमता २६०.७५ मेगावॉटने वाढली. या योजनेमुळे ग्राहकांच्या वीज वापरावरील देयकात मोठी घट झाली आहे. सोबतच सौर ऊजेर्चा वापर वाढल्याने कोळशावरील वीज निर्मितीवरील ताण कमी होऊन पर्यावरण संवर्धनातही मदत होत आहे.

सर्वाधिक १० हजार ७७७ वीज निर्मिती संच नागपूर जिल्ह्यात कार्यान्वित झाल्याने येथील वीज निर्मिती क्षमता ४३.९३ मेगावॉटने वाढली आहे. त्यात शहरी भागातील ९ हजार ५१८ संच (३९.०७ मेगावॉट), ग्रामीण भागातील १ हजार २५९ संचांचा (४.८६ मेगावॉट) समावेश आहे. जळगाव जिल्ह्यात ५ हजार १७९ संच कार्यान्वित झाल्याने येथील वीज निर्मिती क्षमता १९.३५ मेगावॉट, अमरावती जिल्ह्यात ४ हजार ४३ संच कार्यान्वित झाल्याने येथील क्षमता १७.२६ मेगावॉट, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४ हजार ८१२ संच कार्यान्वित झाल्याने येथील क्षमता १७.८४ मेगावॉट, नाशिक जिल्ह्यात ४ हजार ३९७ संच कार्यान्वित झाल्याने येथील क्षमता १५.९४ मेगावॉटने वाढली आहे.

# शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगाम पीक स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात. या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी येत्या हंगामात खरीप हंगाम पिक स्पर्धा घेण्यात येत आहे. यात शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतीची उत्पादकता वाढावी, यासाठी शेतकरी विविध प्रयोग करतात, अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देवून विजेत्या शेतकऱ्यांना गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढते. ते अधिक उमेदीने नवनवीन आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास पुढे येतात. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल, तसेच परिसरातील इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शक होवून जिल्ह्याच्या उत्पादनात भर पडेल, यासाठी कृषि विभागातर्फे पिक स्पर्धा घेण्यात येत आहे.

पिक स्पर्धेतील जिल्ह्याकरिता रब्बी हंगामातील स्पर्धेसाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पिके समाविष्ट करण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे आणि ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. तसेच एकावेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. लाभार्थीचे शेतामध्ये त्या पिकाखालील किमान 40 आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. पिक स्पर्धेसाठी प्राप्त झालेले सर्व अर्ज स्पर्धेकरिता पात्र राहतील. पिक स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळविलेल्या शेतकऱ्याला पुढील पाच वर्षे त्याच पिकाकरीता पिक स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

सर्वसाधारण गटासाठी प्रवेश शुल्क पिकनिहाय प्रत्येकी 300 रुपये, तर आदिवासी गटासाठी 150 रुपए राहणार आहे. मुग आणि उडीद पिकासाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम दि. 31 डिसेंबर 2024 आहे.

पिकस्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी अर्ज विहित नमुन्यामध्ये भरून त्यासह प्रवेश शुल्क चलन, सातबारा, आठ अ चा उतारा आणि अनुसूचित जमातीचा असल्यास जात प्रमाणपत्र संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत. पुरेशे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या पिकाची पिकस्पर्धा जाहीर करतील.

तालुका पातळी स्तरावर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले पाच हजार रुपए, दुसरे तीन हजार रुपए, तिसरे दोन हजार रुपए बक्षीस देण्यात येणार आहे. जिल्हा पातळीवर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिले 10 हजार रुपए, दुसरे सात हजार रुपये, तिसरे पाच हजार रुपए बक्षीस असणार आहे.

# स्पा सेंटरच्या आड देह विक्रीचा व्यवसाय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

सलून अकॅडमी आणि स्पा सेंटरच्या आड देह विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या एका आरोपीला गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा शाखेने अटक केली. पोलिसांनी स्पामधून 4 पीडित महिला आणि तरुणींची सुटका केली. मनोज उर्फ राजा रमेश बंदेवार (24) रा. लक्ष्मी विहार अपार्टमेंट, वर्धा रोड असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

वर्धा मार्गावरील लक्ष्मी विहार अपार्टमेंटमधील स्पर्श सलून अकॅडमी आणि स्पा सेंटरमधून देह विक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंटरला ग्राहक बनवून तेथे पाठवले. पंटरने सौदा ठरताच पोलिसांना इशारा दिला. पोलिसांनी स्पा सेंटरमध्ये धाड टाकली. पंचासमोर झडती घेतली असता पोलिसांनी तेथे 4 पीडित तरुणी मिळाल्या. त्यातील दोन सिक्कीम येथील रहिवासी आहेत, तर दोन नागपूरच्याच आहेत. सिक्कीमच्या तरुणींना स्पामध्ये काम करण्याच्या बहाण्याने नागपुरात बोलावण्यात आले होते.

त्यांना पैशांचे आमिष दाखवून देह व्यवसायाच्या नरकात ढकलण्यात आले. आर्थिक परिस्थितीमुळे त्या राजाच्या जाळ्यात अडकल्या. राजाने स्पा सेंटरमध्ये वेगवेगळे कॅबिन बनवून ठेवले होते. पोलिसांनी राजाकडून 2 मोबाईल फोन, रोकड आणि इतर साहित्यासह 31,600 रुपयांचा माल जप्त केला. त्याच्याविरुद्ध सोनेगाव पोलिस ठाण्यात पीटा ॲक्टच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

# बसमधून सोन्याचे दागिने नेताना पकडले

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :

गोपनिय माहितीच्या आधारावर पोलिसांनी बसमधून प्रवास करीत असलेल्या एका व्यक्तीला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ सोन्याचे दागिने मिळाले. चौकशीत तो कुरिअर एजन्ट असल्याचे समजले. सर्व बिले तपासल्यानंतर पोलिसांनी त्याला सोडून दिले.

नागपूरवरून चंद्रपूरला जात असलेल्या एमएच-40/सीएम-4241 क्रमांकाच्या एसटी बसमध्ये काळा जॅकेट घातलेला एका व्यक्ती बसलेला आहे. त्या व्यक्तीकडे हवालाचा माल असून स्थानकाहून बस निघाली असल्याची माहिती पोलिस मुख्यालयात कार्यरत कॉन्स्टेबल पंकज रामटेके यांना शनिवारी दुपारी मिळाली. सुटीवर असतानाही रामटेके तत्काळ छत्रपती चौकात पोहोचले. वाहतूक पोलिसांच्या मदतीने बस थांबवली. चार संशयितांच्या बॅगची तपासणी केली असता एकाच्या बॅगमध्ये बॉक्स दिसले. त्यामध्ये सोने होते. वाहतूक पोलिसांनी नियंत्रण कक्षाला माहिती दिली.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **YASMEEN BANO.** NOW MY NEW NAME IS **YASMEEN BANO MOHAMMAD ASIF PALLA.**
**ADD :** BEHIND LAL PATTHAR CHUNA MASJID NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ASIF.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ASIF PALLA.**
**ADD :** BEHIND LAL PATTHAR CHUNA MASJID NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **HUMA TASNEEM.** NOW MY NEW NAME IS **HUMA TASNEEM MOHAMMAD ASIF PALLA.**
**ADD :** BEHIND LAL PATTHAR CHUNA MASJID NAGPUR 440018.

MY OLD NAME WAS **SHAFIQUA PARVEEN M.A. SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **SHAPHIKA PARVIN MOHAMMAD ASLAM SHEIKH.**
**ADD :** NALNDA CHOUK SHANTINAGAR NAGPUR 440002.

MY OLD NAME WAS **AHMED KHAN.** NOW MY NEW NAME IS **AHEMAD KHAN SIKANDAR KHAN.**
**ADD :** AT POST ASEGAON WASHIM- 444409.



# देवाभाऊ, पुन्हा येताहेत...

महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी २० डिसेंबरला मतदान झाले आणि २३ डिसेंबरला मतमोजणी झाली. मतमोजणीनंतर भाजपा हा सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आल्याचे स्पष्ट झाले. भाजपा, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस अशा सत्ताधारी महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले. महायुतीचे २३५ आमदार निवडून आले. महाराष्ट्रात विधानसभेच्या झालेल्या सलग तीनही निवडणुकांमध्ये भाजपाचे सर्वाधिक आमदार निवडून येत आहेत. मोदी लाटेत सन २०१४ मध्ये भाजपाचे १२२ आमदार निवडून आले होते. शिवसेनेशी युती केल्यावर २०१९ भाजपाचे १०५ आमदार विजयी झाले. यावर्षी २०२४ मध्ये भाजपाने १४८ मतदारसंघांत निवडणूक लढवली व १३२ आमदार निवडून आणण्याचा विक्रम केला. भाजपाचा विजयाचा स्ट्राईक रेट हा सुद्धा विक्रमी म्हणजेच ८९ टक्के आहे.

महाराष्ट्रात महायुतीने निवडणुकीत मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केलेला नव्हता. शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच महायुतीने निवडणूक लढवली. शिंदे यांच्या शिवसेनेचे ५७, तर अजितदादांच्या राष्ट्रवादीचे ४१ आमदार विजयी झाले. गेली दहा वर्षे महाराष्ट्रात भाजपाचा चेहरा देवेंद्र फडणवीस हेच आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालीच भाजपाने यंदाची विधानसभा निवडणूक लढवली. देवेंद्र यांनी केलेले कठोर परिश्रम, पक्षाला सर्वाधिक यश मिळावे म्हणून केलेली अहोरात्र मेहनत, महाआघाडीवर मात करण्यासाठी राबवलेली कुशल रणनीती, महायुतीच्या जागावाटपापासून ते उमेदवारांची निवड, प्रचाराची आखणी अगदी उमेदवारांच्या विजयापर्यंत केलेले नेटके नियोजन. अशा सर्वच बाबतीत देवेंद्र हे सक्रिय होते. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका व असलेल्या त्रुटी दूर करून नव्या जोमाने त्यांनी राज्यात विधानसभा निवडणूक लढवली. आपल्या कार्यकर्तृत्वातूनच त्यांनी महाराष्ट्राचा नंबर १ नेता अशी प्रतिमा निर्माण केली. देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे बॉस आहेत हीच आज कार्यकर्त्यांची भावना आहे.

२३ नोव्हेंबरला निकाल लागल्यानंतर व महायुतीला जनतेने सरकार स्थापनेचा स्पष्ट जनादेश दिल्यानंतर राज्याचा मुख्यमंत्री कोण या प्रश्नाचे उत्तर महायुतीचे नेते आठ दिवस झाले तरी देऊ शकले नाहीत. महाराष्ट्रात नेतेपदाविषयी एकमत होत नाही म्हणून एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजितदादा यांना दिल्लीला जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा करावी लागली. त्यांच्याबरोबर तीन तास झालेल्या चर्चेनंतरही मुख्यमंत्री कोण? हे जनतेला समजले नाही. स्वत: एकनाथ शिंदे यांनी निकालाच्या चौथ्या दिवशी मोदी-शहांना फोन करून ते जो निर्णय घेतील तो अंतिम असेल, तो आम्ही स्वीकारू, आमच्याकडून कोणताही अडथळा निर्माण केला जाणार नाही, असे स्पष्ट केले. तरीही मुख्यमंत्री कोण हे ठरवायला इतका विलंब का लागावा? भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसला किती मंत्रीपदे व कोणती खाती द्यायची यावरसुद्धा बराच खल झाल्याच्या बातम्या झळकल्या. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून काम अफाट केले. विकासाच्या कामांना विलक्षण वेग दिला. कल्याणकारी योजनांचा धडाका लावला. निवडणुकीत गेम चेंजर ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे जनक म्हणून एकनाथ शिंदे यांचेच नाव घेतले जाते. त्यांना मुख्यमंत्रीपदाचा अडीच वर्षे असा कालावधी मिळाला. उद्धव ठाकरे यांची शिवसेना फोडल्याची व ठाकरेंच्या नेतृत्वाविरोधात ४० आमदारांसह बंडखोरीची बक्षिसी म्हणून भाजपाने त्यांना थेट मुख्यमंत्रीपदाच्या सिंहासनावर बसवले. खरे तर भाजपाकडे सर्वाधिक म्हणजे १०५ आमदार असतानाही फडणवीस यांना शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून काम करण्याचा आदेश श्रेष्ठींनी दिला. पाच वर्षे मुख्यमंत्रीपदावर काम केलेल्या फडणवीस यांनी पक्षशिस्त म्हणून तो आदेशही निमूटपणे पाळला. आता पक्षाचे १३२ आमदार निवडून आल्यावर त्यांनी पुन्हा का पडती भूमिका घ्यावी? संख्येने कमी असलेल्या मित्रपक्षाला मुख्यमंत्रीपद का द्यावे अशी जोरदार मोहीम पक्षातून सुरू झाली. आता देवाभाऊ मुख्यमंत्री झाले नाहीत, तर आपण आत्मदहन करू, अशी भावनाही मुंबईतील कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. काहीही झाले तरी मुख्यमंत्री भाजपाचाच झाला पाहिजे व देवाभाऊच मुख्यमंत्री हवेत अशी पक्षात सर्व स्तरावर प्रबळ भावना आहे.

**महाराष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा आहे, यात गैर काही नाही. त्यांनी अडीच वर्षे या पदावर झपाटून काम केले व त्याचे फळही विधानसभा निवडणुकीत तीनही पक्षांना मिळाले. अजित पवारांनी त्यांचा पाठिंबा फडणवीस यांना आहे असे जाहीर करून टाकले, पण शिंदे यांनी मोदी-शहाच ठरवतील तो निर्णय आम्ही स्वीकारू असे म्हटले आहे. शिंदे व फडणवीस यांच्यात कुठे तरी शीत संघर्ष आहे याचे संकेत त्यातून महाराष्ट्राला मिळाले.

शिंदे यांच्या नावाला भाजपा हायकमांडकडून हिरवा कंदील मिळत नाही, हे दिसून येताच शिंदे यांचे समर्थकही पुढे सरसावले. शिंदे यांना भाजपाने वापरून घेतले अशी चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली. शिवसेना फोडण्याचे काम शिंदे यांनी उत्तम केले, भाजपाचे काम पूर्ण झाले, अशी टीका झाली. मित्रपक्षांचा हात धरून भाजपा मोठा झाला व काम झाले की मित्रपक्षाला भाजपाने सोडून देतो, अशी टीका सुरू झाली. भाजपा श्रेष्ठींनी शिंदे यांना उपमुख्यमंत्रीपद किंवा केंद्रात मंत्रीपद अशी ऑफर दिल्याचे वृत्तही माध्यमातून झळकले. स्वत: शिंदे मात्र या विषयावर मौन पाळून आहेत. शिंदे यांना राज्यात गृहमंत्रीपद व त्यांच्या पक्षाला विधान परिषद अध्यक्षपद तसेच अन्य चार महत्त्वाची खाती हवीत अशी कुजबूज आहे. फडणवीस हे गृहखाते सोडायला तयार नाहीत तसेच अजितदादांचा अर्थ मंत्रालयासाठी आग्रह कायम आहे. अर्थात हे सर्व अंदाज व चर्चा आहे. एक मात्र खरे की, प्रचंड जनादेश मिळून आठ दिवस उलटले तरी महायुतीला राज्याचा कप्तान जाहीर करता आलेला नाही.

एकनाथ शिंदे किंवा अजितदादांचा पक्ष वेगळा आहे. त्यांचा कार्यक्रम म्हणजे भाजपाचा अजेंडा नाही. काँग्रेस असो किंवा भाजपा, मोठे राष्ट्रीय पक्ष राज्यात सत्तेवर येण्यासाठी प्रादेशिक पक्षांना बरोबर घेतात पण मित्रपक्षांना मोठे करणे यात त्यांना रस नसतो. भाजपा सत्तेवर येता कामा नये, या एकाच मुद्द्यावर महाराष्ट्रात शरद पवारांच्या कल्पनेतून महाविकास आघाडीचा जन्म झाला. त्यामागे विचार, आचार किंवा कार्यक्रम त्यांचे समान आहेत असे मुळीच नाही. विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे तीनतेरा वाजले व मतदारांनी भाजपाला जंगी यश मिळवून दिले. एकनाथ शिंदे व अजित पवार हे भाजपाबरोबर आहेत. त्यांचे भविष्य भाजपामध्येच आहे. बाहेर पडून स्वतंत्र लढतील अशी परिस्थिती आज तरी नाही किंवा स्वगृही जाण्याची शक्यताही दिसत नाही. त्यामुळे त्या दोन्ही नेत्यांची महत्त्वाकांक्षा मोठी असली तर त्यांना मोदी-शहांच्याशी जुळवून घेऊनच आपले अस्तित्व व भविष्य ठरवावे लागणार आहे. भाजपा राज्यात नंबर १ चा पक्ष असला तरी स्वबळावर बहुमत मिळवू शकलेला नाही. म्हणून भाजपालाही मित्रपक्षांची गरज आहे. भाजपा हा महायुतीतील मोठा भाऊ आहे, याची जाणीव ठेऊनच तिन्ही पक्षांना एकमेकांना साथ देऊनच सरकार चालवावे लागणार आहे.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर पक्षाला राज्यात पुन्हा नंबर १ करण्यात देवेंद्र यांचा मोठा वाटा आहे. लोकसभेच्या पराभवानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देऊ केला होता व संघटनेसाठी वाहून घेऊ असे म्हटले होते, पण श्रेष्ठींनी त्यांना राजीनामा देण्यापासून परावृत्त केले. सन २०१९ मध्ये त्यांनी प्रचारात मी पुन्हा येईन अशी घोषणा केली होती. तेव्हाही भाजपा व शिवसेना युतीला जनतेने सरकार स्थापन करण्याचा जनादेश दिला होता, पण उद्धव ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर गेले व ते स्वत:च मुख्यमंत्री झाले. आता २०२४ च्या जनादेशानंतर देवेंद्र यांना सर्व परिस्थिती अनुकूल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे ते लाडके आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मर्जीतील आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याबरोबरीने देवेंद्र यांचे नाव राष्ट्रीय पातळीवर घेतले जाते. राज्यात मराठा आंदोलकांचे नेते मनोज जरांगे यांनी आरक्षण मिळत नसल्याचे खापर फोडत देवेंद्र यांनाच टार्गेट केले. पण महाआघाडीच्या नेत्यांनीही देवेंद्र यांना खलनायक ठरविण्याचा अनेकदा प्रयत्न केला, पण देवेंद्र यांनी आपला संयम कधीच सोडला नाही, तोल कधी ढळू दिला नाही. पक्ष विस्ताराचे आपले ध्येय कधी सोडले नाही. गेली दहा वर्षे देवेंद्र महाराष्ट्रातील राजकारणात केंद्रस्थानी आहेत. पक्षातील विरोधकांना गप्प करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. शरद पवार व उद्धव ठाकरे यांना रोखण्याचे सामर्थ्य त्यांच्या नेतृत्वात आहे. गेल्या पाच वर्षांत दोन वेळा मुख्यमंत्रीपदाने त्यांना हुलकावणी दिली, तरी त्यांनी आपली चिकाटी सोडली नाही. आता तर भाजपाचे आजवरचे सर्वाधिक आमदार विजयी झाले आहेत. केंद्रात नरेंद्र व राज्यात देवेंद्र, अशी घोषणा पुन्हा साकारत आहे. सर्वांचा विश्वास संपादन करून देवाभाऊ पुन्हा येताहेत...

## सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, मो.क्र.९९२२५४६२९५**

## गुलामगिरी पद्धत ही बेकायदा

आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन विशेष.

**इ.स.च्या १९व्या शतकापासून इंग्रजीत स्लेव्हरी-गुलामगिरी हा शब्द अमेरिकेतील गोऱ्या कातडीच्या माणसांनी काळ्या कातडीच्या माणसांच्या केलेल्या गुलामीबद्दल जास्त करून वापरला गेला आहे. सुरुवातीला गुलामगिरी केवळ अमेरिकेच्या दक्षिणी राज्यांमधेच नव्हती, तर उत्तर क्षेत्रातही होती. व्हरमाँट गुलामगिरीचे उच्चाटन करण्यासाठी प्रथम राज्य म्हणून अस्तित्वात आहे, सन १७७७ मध्ये अमेरिकेने ब्रिटनमधून स्वत:ला मुक्त केल्यानंतर ती सुरू झाली. तब्बल सात वर्षांनंतर सर्व उत्तर राज्यांनी गुलामगिरीवर बंदी घालण्याची शपथ घेतली. परंतु उत्तर प्रदेशात बरीच वर्षे गुलामगिरीचा अभ्यास चालूच होता. याचे उत्तर असे की, उत्तर अमेरिकेने या कायद्याची अंमलबजावणी केली ज्यामुळे गुलामगिरीचे उन्मूलन तात्काळ करता आले नाही. श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींनी मांडलेली ही ज्ञानवर्धक माहिती...**

पीबीएसने असे सुचवले की, पेनसिल्वेनियाने सन १७८० मध्ये गुलामगिरी क्रांतीदिनाच्या कायद्याची अंमलबजावणी केली, परंतु हळूहळू एक त्रूटी सांगण्यात आली. सन १८५० मध्ये पेनसिल्वेनियाच्या शेकडो बंदिवानांना बंधनात ठेवणे चालूच राहिले. सन १९६१ मध्ये गृहयुद्ध सुरू होण्याआधीच एका दशकाहून अधिक काळापर्यंत उत्तर प्रदेशात दासत्त्व सुरूच राहिले. जगभरातून गुलामगिरी संपवण्यासाठी दरवर्षी २ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन साजरा केला जातो. प्राचीन काळापासून चालत आलेली गुलामगिरी आजही या ना त्या स्वरूपात कायम आहे. संयुक्त राष्ट्र संघाने दरवर्षी हा दिवस आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन साजरा करण्याची घोषणा केली आहे. मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसाय रोखण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने एक ठराव मंजूर केला, ज्यामध्ये २ डिसेंबर रोजी गुलामगिरी निर्मूलन दिन साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. महिलांसाठी हा दिवस खुप खास आहे. सध्याच्या गुलामगिरीचा अंत करणे ही या दिवसाची मुख्य थीम आहे. यामध्ये मानवी तस्करी, लैंगिक शोषण, बालमजुरी, सक्तीचे विवाह, मुलांवर दबाव आणणे आणि शस्त्रांच्या शर्यतीत भरती करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. हे सर्व प्रकार आधुनिक युगातील गुलामगिरीचे प्रतीक आहेत.

पार्श्वभूमी-२ डिसेंबर १९४९ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत एक ठराव मंजूर करण्यात आला, ज्या अंतर्गत आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन स्वीकारण्यात आला. मानवी तस्करी थांबवणे आणि वेश्याव्यवसाय थांबवणे हा यातील मुख्य उद्देश होता. ठराव ३१७ (आयव्ही) दोन्ही गुलामगिरीचे प्रतीक मानून पारित करण्यात आले. गुलामगिरी म्हणजे वेठबिगार अशी गल्लत करू नका. गुलामगिरी ही श्रमिकांच्या शोषणाची एक पद्धत आहे. ज्या व्यवस्थेत माणसांना कोणाचीतरी मालमत्ता समजले जाते आणि बळाचा किंवा धाकाचा वापर करून काम करायला लावले जाते, तिला सर्वसाधारणपणे गुलामगिरी किंवा गुलामी अशी संज्ञा आहे. गुलामांना त्यांच्या इच्छेविरुद्ध विकत घेण्यात येत असे किंवा ते जन्मापासूनच गुलाम समजले जात असत. काम सोडून जाण्याचा, कामास नकार देण्याचा किंवा कामासाठी मोबदला मागण्याचा अधिकार त्यांना नसे. काहीं जुन्या गुलामगिरीच्या व्यवस्थांमध्ये मालक गुलामांना ठारही मारू शकत आणि ते कायद्यात बसत होते. इतिहासातील अनेक समाजांनी गुलामगिरीची पद्धत उघडपणे मान्य केली होती. आधुनिक काळात जगभरातील बहुतांश ठिकाणी गुलामगिरी जरी बेकायदा असली, तरीही ती काही स्वरूपात चालू आहेच. उदा: धन्याच्या कर्जात अडकलेले नोकर, घरी कायमस्वरूपी ठेवलेले नोकर, दत्तक घेतलेल्या मुलांचा नोकर म्हणून वापर, मुलांचा सैनिक, क्रांतिकारी वा दहशतवादी म्हणून वापर, जबरदस्तीने केलेले लग्न, कामेच्छेसाठी वापरले जाणारे किंवा पुरविले जाणारे गुलाम आदींचा समावेश होतो. गुलामगिरी माणसाच्या लिखित इतिहासाच्याही पूर्वीपासून अनेक संस्कृतींमध्ये चालू होती. आज जगात उपरोक्त प्रकारच्या गुलामांची संख्या १.२ ते २.७ कोटी असावी, असा अंदाज आहे. मात्र एकंदरीत लोकसंख्येच्या मानाने हे प्रमाण ऐतिहासिक प्रमाणापेक्षा अत्यल्प मानता येईल. यातील सर्वाधिक संख्या दक्षिण आशियातील कर्जबाजारी झालेल्या नोकरांची आहे. अनेकदा ही गुलामी पिढ्यानपिढ्या चालू राहते. बायका आणि मुलांचे लैंगिक शोषण आणि त्यासाठी त्यांची केली जाणारी आयात-निर्यात हा गुलामगिरीचा एक स्वतंत्र भागच आहे. औद्योगीकरणाच्या आधी गुलाम आणि त्यांची श्रमशक्ती यांना आर्थिक दृष्टीने मोठेच महत्त्व होते. यंत्रयुगात मानवी श्रमांचे आर्थिक महत्त्व कमी होत चालले आहे. नोरबेर्त विनर म्हणतात, यंत्रशक्तीमध्ये मानवी श्रमांचे आर्थिक मूल्य आहे, पण गुलामगिरीत जी क्रूरता असते ती नाही. १९व्या शतकाच्या सुरुवातीस गुलाम व भूदास ह्यांची संख्या लोकसंख्येच्या तीन चतुर्तांश होती. यंत्रयुगात प्रचंड प्रमाणावर मजूर लागत नाहीत त्यामुळे गुलामीचे आर्थिक महत्त्व निघून गेले आहे. गुलामी मात्र आर्थिक कारणांसाठी नाही तर मानवी हक्क म्हणून बेकायदेशीर केली गेली.

गुलाम हा मूळ अरबी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ सेवक असा होतो. नंतर तो बहुधा मध्ययुगीन काळात उर्दू व अन्य भारतीय भाषांमध्ये आला असावा, असा अंदाज बांधला जातो. संस्कृत भाषेत मात्र हा शब्द आढळत नाही, हे उल्लेखनीयच!

!! विश्व गुलामगिरी निर्मूलन दिनाच्या सर्व बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन**
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर, गडचिरोली.
फक्त मोबा-७७७५०४१०८६.

## सनातन संस्थेचे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी घेतलेले हिंदु राष्ट्राचे ध्येय साकार होण्याची वेळ आली !

२५ वर्षांपूर्वी हिंदु शब्दही उच्चारणे अत्यंत कठिण होते; त्या काळात गोव्यात स्थापन झालेल्या सनातन संस्थेच्या संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी हिंदु राष्ट्र स्थापनेचा संकल्प नुसता नाही, तर प्रवाहाच्या विरूद्ध जाऊन अनेक संकटे झेलत हिंदु राष्ट्राची जागृती संपूर्ण देशभरात केली. यामागे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे तपोबल आहे. आज हिंदु राष्ट्र येणार याची सर्वांना खात्री झाली असून ते हिंदु राष्ट्राचे ध्येय साकार होणार होण्याची वेळ जवळ आली आहे. हिंदु राष्ट्र लवकरच साकार होईल, असे गौरवोद्गार श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी काढले. ते रामराज्याचे ध्येय उराशी बाळगणाऱ्या सनातन संस्थेचा रौप्य महोत्सव सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

सुकुर पंचायत सभागृह गोवा येथे ३० नोव्हेंबर या दिवशी भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याच्या प्रसंगी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, गोव्याचे पर्यटनमंत्री श्री. रोहन खंवटे, महाराष्ट्र गो सेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा, गोव्यातील आमदार श्री. चंद्रकांत शेट्ये, आमदार श्री. प्रेमेंद्र शेट, आमदार श्री. उल्हास तुयेकर आणि सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस हे मान्यवर उपस्थित होते. यांसह या सोहळ्याला सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ, तसेच सनातन प्रभात नियतकालिक समुहाचे माजी समूह संपादक पू. पृथ्वीराज हजारे यांची वंदनीय उपस्थिती लाभली.

गोवा सरकार देव, देश आणि धर्म रक्षणाचे कार्यासाठी कटीबद्ध ! -मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत

देवाला महत्त्व दिले, तर धर्म जागृत राहिल आणि धर्म जागृत राहिला तर देश जागृत राहिल. यासाठी गोवा सरकार देव, देश आणि धर्म रक्षणाचे कार्यासाठी कटीबद्ध आहे. सनातन संस्थेने कठीण प्रसंगांना सामोरे जाऊन आज देशभरात भरीव असे कार्य केले आहे. सनातन संस्थेचा गोव्यातील रामनाथी येथील आश्रमातून हिंदु धर्माचे रक्षणाचे महत्त्वाचे कार्य चालते. सनातन संस्थेचा सनातन प्रभात हे नियतकालिक हिंदूंवर देश आणि विदेशात होत असलेल्या अत्याचार, तसेच हिंदू करत असलेले चांगले कार्य याची निरंतर माहिती देऊन हिंदुत्वाच्या जागृतीचे कार्य करत आहे. प.पू. गोविंददेव गिरी महाराज यांच्या सारख्या अनेक राष्ट्रसंतांमुळे भारतात देव, देश आणि धर्म रक्षणाचे कार्य चालत आहे, असे गोव्याचे मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत यांनी या प्रसंगी सांगितले.

सनातन संस्थेच्या कार्यामुळे हजारो लोक तणावमुक्त आणि व्यसनमुक्त बनले ! - श्री. श्रीपाद नाईक, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री

प.पू. गोविंददेव गिरि महाराज यांचे कार्य महर्षि वशिष्टाप्रमाणे अखंड असे धर्मरक्षणाचे कार्य केले आहे. महाराजांची साधना आणि कार्य यांमुळे असंख्य जिवांच्या जीवनात चांगले पालट होऊन आज राष्ट्रभक्त निर्माण होत आहेत. सनातन संस्थेने हिंदु धर्माचे पुनर्स्थानेचे विलक्षण असे कार्य केले आहे. या कार्यामुळे हजारो लोक तणावमुक्त आणि व्यसनमुक्त जीवन जगू लागले आहेत. सनातनच्या कार्यामुळे धर्म आणि अध्यात्म यांचे रक्षण झालेले आहे, असे उद्गार केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांनी काढले.

गोव्याचे पर्यटनमंत्री श्री. रोहन खंवटे म्हणाले की, सनातन संस्था ही सनातन धर्माचे रक्षण आणि मानवी मूल्याचे रक्षण करण्याचे महान आणि पवित्र असे कार्य करत आहे. राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांनी धर्मरक्षणाच्या कार्यालाही हातभार लावला पाहिजे. गोव्याची ओळख पूर्ण सन, सँड आणि सी (समुद्रकिनारे) अशी होती. पर्यटन खात्याने गोव्याची ही ओळख पालटण्याचा प्रयत्न केला आहे. पर्यटन खात्याने एकादश तीर्थ योजना कार्यान्वित करून गोव्यात १०० वर्षे जुनी आणि प्रसिद्ध मंदिरे या योजनेखाली आणली. गोवा सरकारने छत्रपति शिवाजी महाराजांच्या गोव्यातील कार्याची माहिती पुढील पिढीपर्यंत पोचवण्यासाठी नार्वे येथील श्री सप्तकोटेश्वर मंदिराची पुर्नबांधणी केली.

या वेळी सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस म्हणाले की, सनातन संस्था हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी गेल्या २५ वर्षांच्या काळात जिहादी, कम्युनिष्ट, अर्बन नक्षलवादी आदींचा प्रखर विरोध सहन करून अग्निदिव्यातून तावून सुलाखून बाहेर पडलो. सनातन संस्था एक प्रखर हिंदुत्वनिष्ठ संघटना प्रसिद्ध झाली आहे. केंद्रीय गृह मंत्रालय सिद्ध करत असलेल्या सी.ए.ए. कायद्याच्या प्रक्रियेत सनातन संस्थेचा सहभाग होता आणि यामुळे कायद्याची व्याप्ती बांगलादेशीपर्यंत पोचण्यास साहाय्य झाले. वक्फ संशोधन विधेयक सिद्ध करण्याच्या प्रक्रियेतही सनातन संस्थेने उल्लेखनीय सूचना केल्या आहेत.

महाराष्ट्र गो सेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा यांनी महाराष्ट्राप्रमाणे गोवा राज्यानेही गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्याची मागणी केली. सर्व राज्यांनी जर गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिल्यास गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळाल्याशिवाय रहाणार नाही, असेही त्यांनी म्हटले.

या सोहळ्याचा आरंभ दीपप्रज्वलन, तसेच वेदमंत्रपठणाने सोहळ्याला प्रारंभ झाला. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. प्रारंभी प.पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे ७५ दिव्यांनी औक्षण करण्यात आले आणि यानंतर गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि पर्यटनमंत्री श्री. रोहन खंवटे यांच्या हस्ते प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा सत्कार करण्यात आला. यासह सनातन संस्थेच्या वतीनेही प.पू. स्वामीजींचा हृद्य सन्मान सनातन संस्थेचे विश्वस्त श्री. वीरेंद्र मराठे यांनी केला. या मंगल प्रसंगी गोव्यातील गीता परिवाराच्या वतीनेही प.पू. स्वामीजींचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी तपोभूमी कुंडई येथील पीठाधिश्वर ब्रह्मेशानंद स्वामी महाराज यांचा आशीर्वचनपर व्हिडिओ संदेश प्रसारित करण्यात आला.

सनातन संस्था निर्मित ई-बूक्सांचे प्रकाशन !

या वेळी प.पू. स्वामीजींच्या हस्ते सनातन प्रभातच्या रौप्यमहोत्सवी अंकाचे प्रकाशन, सनातन संस्था निर्मित कुंभपर्व माहात्म्य या मराठी भाषेतील ई-बूकचेप्रकाशन आणि सनातन आश्रम दर्शन या व्हिडिओचे लोकार्पण करण्यात आले. सोहळ्यात सूत्रसंचालन श्री. चैतन्य तागडे यांनी, तर आभारप्रदर्शन सनातन संस्थेचे विश्वस्त श्री. वीरेंद्र मराठे यांनी केले.

**चेतन राजहंस,**
**राष्ट्रीय प्रवक्ते, सनातन संस्था,**
**(संपर्क क्र.: ७७७५८५८३८७)**

## (गुरु वचन)

# मृत्यूचे भय नाही

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते. चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

# दानामुळे मिळणारे लाभ..!

बौद्ध धम्मामध्ये दानाला महत्वाचे स्थान आहे. पुण्यकर्मासाठी दान करणे, प्रथम तसेच श्रेष्ठ मानले आहे. दान परित्याग विचार आहे. पुण्यकर्मामध्ये दानाचे सर्वप्रथम स्थान आहे. दानाच्या विचार, दान देण्याआधीचा विचार, दान देत असतांनाचा विचार, दान दिल्यानंतरचा विचार अशा फरकाने तीन प्रकारचे दान आहे. दान देईल अशा प्रकारच्या विचाराला घेऊन दान देण्यासाठी वस्तू नसल्यावरही ती वस्तू प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यापासून तर मी दान देतो या प्रकारचे विचार उत्पन्न होण्याच्या वेळेपासून पहिल्या क्षणापर्यंत उत्पन्न विचाराचा मनात उत्पन्न होणारी दानाची पूर्व चेतना म्हणतात. मी दान देतो या विचाराने क्षणामध्ये उत्पन्न होणाऱ्या विचाराला मध्य चेतना म्हणतात. तसेच दान दिल्यानंतर त्या दानाचे स्मरण करून मनामध्ये उत्पन्न झालेल्या कुशल विचाराला दानाचा अंत विचार म्हणतात. दान हें पुण्य, श्रेष्ठ, गती आणि भाग्य, संपत्ती प्राप्त करून देणारे आहे. दान देणाऱ्याचे मन, दान देण्याच्या वस्तू आणि दान ग्रहण करणाऱ्याच्या पात्रतेने दान हिन, मध्यम तसेचं उत्तम प्रकारे तीन प्रकारचे असते. कीर्ती आणि प्रशंसेसाठी केलेले दान हीन, चांगल्या प्रवाहाची प्राप्ती व्हावी या इच्छेने केले गेलेले दान मध्यम, तसेच कोणत्याही फळाची इच्छा न करता निष्पर भावनेने दिल्या गेलेले दान उत्तम दान होय. अथवा आपल्याला मोठे दाखविण्यासाठी दिल्या गेलेले दान हिन दान होय. लौकिक सुख प्राप्तीसाठी दिल्या गेलेले दान म्हणजे मध्यम दान होय. चांगला मार्ग, फळ प्राप्तीसाठी केलेले दान श्रेष्ठ दान होय. बहुसंपत्तीची इच्छा ठेवून दिल्या गेलेले दान हिन दान होय. स्वत:ला संसारिक प्रपंचातून मुक्त होण्यासाठी दिल्या गेलेले मध्यम दान आहे. तसेच संपूर्ण प्राणीमात्रांच्या मुक्तीसाठी करत असलेले बोधिसत्वाचे दान परमिता प्रणिता म्हणजे प्राण्यांच्या हितासाठी केलेले दान हे उत्तम श्रेष्ठ दान आहे. दान देत असताना वस्तू दान देणारा तसेच क्रमाने लोभ कमी होत असतो. त्यामुळे दानाने त्या मनाला उत्पन्न संपत्ती मिळत असते. देत असलेल्या वस्तूची देणगी शुद्धता, स्वीकारण्याची योग्यता तसेच दान देत असताना मनाच्या निर्माणतेने दानाचे फळ सुद्धा अतिउत्तम होत असते. दानामुळे सांसारिक सुख साधन तसेच आध्यात्मिक सुखाची प्राप्ती होत असते. दानामुळे मिळणारे पाच फळ आपल्याला इथेच पाहता येते. दान देणारी व्यक्ती सर्वांना प्रिय वाटत असते. दान देणाऱ्याची दूरपर्यंत कीर्ती पसरत असते. दान देणारी व्यक्ती ज्या सभेमध्ये जातो, तेथे त्याला आदर मिळतो. निर्भय आणि प्रसन्न मनाने विहार करत दान देणारी व्यक्ती मरतेवेळी कमी दु:खाचा अनुभव करतो. दान देणारी व्यक्ती मृत्यूनंतरही आपले नाव अवलोकिक करतो. नंतर सुगती प्राप्त करतो. कुशल कर्माच्या फळामुळे मानवाला सुख प्राप्त होते. भयंकर दु:खदायी यातना भोगत असताना तसेच दान अधिक पुण्यकर्माच्या फळामुळे मानव श्रेष्ठ गतीला प्राप्त करीत असतो. दान करणारी व्यक्ती श्रेष्ठ लोकांमध्ये सौंदर्यवान लोकांमध्ये वास करतो. त्याने कधी न पाहिलेल्या वाहनांना, सुखाला, चांगल्या लोकांना पाहून तो अत्यंत प्रसन्न होत असतो. तो हा विचार करतो की मी कधीतरी चांगले कृत्य केले आहे म्हणून चांगल्या कृत्याच्या फळामुळे हे श्रेष्ठ लोकांमध्ये श्रेष्ठतम फळाला प्राप्त करून सुख अनुभव करीत आहोत. त्या व्यक्ती पुष्कळ लोकसेवा करीत असतात. तो व्यक्ती आधारास पात्र असतो. त्याला कसल्याही गोष्टीचा मनात भय नसतो. तसेच तो व्यक्ती प्रसन्न असतो. दान देणारे व्यक्ती विश्वासू, सज्जन लोकांचे यश वाढवणारी, कुळाचा दागिना तसेच सर्वांना प्रसन्न करणारा व्यक्ती ठरतो. तो निराक्षित लोकांना आश्रय, सर्वांशी प्रसन्न राहणारा, सदाचारी लोकांसोबत सुख पूर्वक राहणारा, ज्या ज्या दिशेने खाली हाताने दान करायला जातो पण सर्व वस्तू त्याच्या सदा सर्वदा सहज प्राप्त होतात. तो लोभ, द्वेष तसेच मोहापासून मुक्त होतो. अशा प्रकारे दानाच्या अनेक गुणांची चर्चा करत असतांना तथागत यांनी म्हटले आहे. 'दान' करणे हें फळाच्या रूपाने मोठा संग्रह आहे. जो कधीच नष्ट होत नाही. जे दुसऱ्यासाठी प्रत्येकाला सोपा आहे. तसेच पुष्कळ सुख देणारा आहे. दान संकटात मित्र आहे. दानाचा संग्रह तसेच काळ परिस्थितीला शोभेल असे प्रत्येक वेळी हितकारी तसेच सुखदायी आहे. दानाचे महत्त्व यावर प्रकाश टाकत असताना सांगितले गेले आहे की दान संग्रह केलेल्या वस्तूंमध्ये श्रेष्ठ आहे. दान सुखाचा सरळ मार्ग आहे. दानामध्ये प्रथमत: श्रेष्ठ सुख आणि संपत्ती प्राप्त करून देणारे आहे. अशा प्रकारे दानाच्या श्रेष्ठ गुणांना जाणून घेऊन, दु:खी कष्टी व्यक्तीला भेटून दानात गरजेच्या वस्तू, अन्न, कपडे, फळे इत्यादी दान केले पाहिजे. जे कोणी व्यक्ती दान करीत नसेल तर ती व्यक्ती निश्चितच त्या दानाच्या मिळणाऱ्या महान पुण्यापासून वंचित राहू शकते. दान हेच दुर्गती पासून वाचवीत असते. म्हणून दान पारमितांचे त्यामध्ये प्रथम स्थान आहे. जातक कथेमधून स्पष्ट कळते की धन, पैसा, अन्न याव्यतिरिक्तही आपले शरीर दान सुद्धा केले हे जातक कथेत सांगितले आहे. यातून मिळणारे सुख निरंतर मनाला व इतरांना आनंद प्रेरणा देणारे आहे.

**सौ चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि अकोला**
**९८३४५८३६८५**

## अशोकायन...

# जो वादा कीया वो

विजयी उमेदवारांनो -
जनतेने दिला तुम्हा कौल
कायापालट करून
मतदार संघाचा
आता खरे करावे बोल . .

देऊनी विविध आश्वासने
सिंहासन केले काबीज
समस्यांची करण्या पुर्ती
आता करावी तजबिज . .

गटबाजीचे राजकारण
निर्माण करते भौ तेढ
बंधुभावाच्या नात्याने करा
विकासकार्याची मुहुर्त मेढ . . !



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

# स्टेट बँक ऑफ इंडिया साजरा करतेय प्रतिष्ठित शाखेचा शतकोत्तर वारसा आणि उत्कृष्टता



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १ : स्टेट बँक ऑफ इंडियाच्या समृद्ध वारशाचा गौरव करून, भारताच्या माननीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहारमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी एसबीआयच्या प्रतिष्ठित हॉर्निमन सर्कल शाखेच्या शताब्दीनिमित्त खास छ१०० च्या स्मृती नाण्याचे अनावरण केले. नाण्याचे अनावरण करत असतानाच वित्तमंत्र्यांनी 'द इव्होल्युशन ऑफ स्टेट बँक ऑफ इंडिया' मालिकेच्या पाचव्या आवृत्तीचे उद्घाटनही केले. यात १९८१ ते १९९६ मधील बँकेच्या प्रवासातील एका परिवर्तनीय युगाचे वर्णन आहे. वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री. एम. नागराजू यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी बोलताना केंद्रीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहारमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन म्हणाल्या, एसबीआयचा उल्लेखनीय प्रवास हा त्यांच्या प्रतिष्ठित शाखेच्या शताब्दी सोहळ्याच्या समारंभात, वाढ आणि सेवेचा असाधारण वारसा प्रतिबिंबित करतो. १९२० च्या विलीनीकरणाच्या वेळी १०० शाखांवरून आज २२,६४०+ शाखांपर्यंत, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये आणखी ५०० जोडण्याच्या योजनांसह, एसबीआयने आपली पोहोच वाढविणे सुरूच ठेवले आहे. एसबीआयचे योगदान आकडेवारीच्या पलीकडे आहे. एसबीआयने अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करून आणि आर्थिक समावेशन सुनिश्चित करून भारताच्या बँकिंग लँडस्केपमध्ये परिवर्तन घडविले आहे. परंपरेला आधुनिकतेशी जोडण्याचा बँकेचा प्रवास हेरिटेज शाखांच्या जतनातून दिसून येतो, तर बँकेचे सारखे प्रमुख डिजिटल प्लॅटफॉर्म जागतिक स्तरावर भारताच्या फिनटेक क्षमतांचे प्रदर्शन करतात.

## सोनी सबवरील तेनाली रामाची भूमिका साकारण्यासाठी अभिनेता कृष्ण भारद्वाजने केले टक्कल

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १ :
एखादी महान व्यक्तिरेखा पडद्यावर जिवंत करणे ही काही सोपी गोष्ट नाही. ते करण्यासाठी पॅशन, निष्ठा आणि कधी कधी धाडसी बलिदान करावे लागते. अभिनेता कृष्ण भारद्वाज तेनाली रामा ही महान व्यक्तिरेखा साकारत आहे, त्यासाठी त्याने पुन्हा एकदा आपल्या निष्ठेचा प्रत्यय दिला आहे आणि व्यक्तिरेखा अस्सल दिसण्यासाठी आपल्या केसांचे पूर्ण टक्कल केले आहे. ही मालिका पुनरागमन करत आहे आणि प्रेक्षक तेनाली रामाचे चातुर्य, त्याची सुजाणता आणि मोहकता पुन्हा अनुभवण्यास उत्सुक आहेत. शूटिंग करताना कृष्णने केलेल्या कायापालटामुळे ते पात्र तर अस्सल वाटू लागलेच पण त्याच्या या कृतीतून या भूमिकेविषयीची कृष्णची एकात्मता दिसून आली. पुन्हा एकदा तेनाली रामाची भूमिका करण्यास सज्ज असलेल्या कृष्ण भारद्वाजने सांगितले, मी स्वतः ब्राह्मण कुटुंबात जन्मलो आहे आणि घरात काही दुःखद प्रसंग घडल्याखेरीज टक्कल करण्यास अनुमती नसते. मला आठवते आहे, पहिल्या सीझनच्या वेळेस जेव्हा मी टक्कल केले, तेव्हा मी घरच्यांना न सांगता तसे केले होते. अगदी शूटिंग



सुरू होण्याच्या अगोदर मी त्यांना सांगितले होते. त्यावर माझी आई म्हणाली होती, हे अशुभ आहे! पण अर्थात माझ्या कामासाठी याची गरज आहे हे तिला माहीत होते, त्यामुळे तिने माझ्या निर्णयाला पाठिंबा दिला. कृष्ण पुढे सांगतो, यावेळी टक्कल केल्यानंतर मला रात्री झोप लागत नाहीये, कारण डोक्याला टक्कल असल्याने उशीवर डोके घासले गेले की खाज येते. माझा लुक देखील संपूर्ण बदलून गेला आहे. तुमचा लुक हा तुमच्या व्यक्तिमत्वाचा खूप मोठा भाग असतो, विशेषतः एका अभिनेत्यासाठी. पहिला सीझन संपल्यानंतर मी पुन्हा केस वाढवण्याचा प्रयत्न केला, पण ते पाहिल्यासारखे दाट झाले नाहीत.

# ॲक्सिस म्युच्युअलफंडातर्फे ॲक्सिस मोमेंटम फंड सादर

## (मोमेंटम थीमचे अनुसरण करणारी ओपन-एंडेड इक्विटी योजना)

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १ : गेल्या काही वर्षांत, गुंतवणूक धोरण म्हणून मोमेंटम भारतात मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय झाले आहे. याचे कारण गुंतवणूकदार देशाच्या गतिमान अर्थव्यवस्थेमध्ये बाजारातील प्रवाह व वाढीच्या संधींचा फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रवृत्तीचा लाभ घेण्यासाठी, भारतातील वेगाने वाढणाऱ्या फंड हाऊसपैकी एक असलेल्याॲक्सिस म्युच्युअलफंडानेॲक्सिसमोमेंटमफंड सादर केला आहे. मोमेंटमथीमचे अनुसरण करणारी ही एक ओपन-एंडेडइक्विटी योजना आहे. संरचित आणि मॉडेल-आधारित दृष्टिकोनाद्वारे तयार केलेल्या या योजनेचे गुंतवणुकीचे उद्दिष्ट म्हणजे मोमेंटमथीमनुसारइक्विटी व संबंधित सिक्युरिटीजपोर्टफोलिओतूनगुंतवणूकदारांसाठी दीर्घकालीन भांडवली वाढ निर्माण करणे आहे. या योजनेचे गुंतवणूक उद्दिष्ट साध्य होईल याची हमी नाही. या सादरीकरणाबाबत बोलताना ॲक्सिस म्युच्युअल फंडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बी गोपकुमार म्हणाले:भारताची विकसित होणारी अर्थव्यवस्था बाजारातील ट्रेंड्सचा प्रभावी लाभ घेणाऱ्यांसाठी वेगळ्या संधी पुरविते.मोमेंटमइन्व्हेस्टिंग, एक धोरण म्हणून, जागतिक स्तरावर स्वीकारले गेलेले आहे आणिवेगाने होणाऱ्याक्षेत्रीयबदलांमुळे व विकसित होणाऱ्या बाजारातील गतीमुळे भारतीय संदर्भात याला अधिक महत्त्व प्राप्त होते.ॲक्सिस मोमेंटम फंडाच्या सादरीकरणाद्वारे आम्ही सातत्याने नाविन्यपूर्णता व बाजाराच्या बदलत्या गतीला अनुसरून गुंतवणूकदारांना अत्याधुनिक गुंतवणूक धोरणांमध्ये प्रवेश देण्याची बांधिलकीजपली आहे.मोमेंटम इन्व्हेस्टिंगच्या ताकदीचा उपयोग करूनआम्ही गुंतवणूकदारांसाठी वाढीचे नवे मार्ग खुले करण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यामुळे त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

मोमेंटम इन्व्हेस्टिंगचे महत्त्व:
धोरण म्हणून मोमेंटमइन्व्हेस्टिंग मजबूत वरच्या दिशेच्या ट्रेंड्ससह अंतरनिहित सिक्युरिटीज ओळखणे व त्यांचा लाभ घेण्यावर केंद्रित आहे. पारंपरिक दृष्टिकोनाप्रमाणे कमी किमतीचे स्टॉक्स किंवा उच्च-वाढीच्या कंपन्या शोधण्याऐवजी, मोमेंटमइन्व्हेस्टिंग जास्त भावात खरेदी करणे व आणखी जास्त भावात विकणे या तत्त्वावर आधारित आहे. मोमेंटम गुंतवणूक सामान्यतः सोपी मानली जाते, पण ती काटेकोर मूल्यात्मक विश्लेषणावर आधारित असते. मजबूत फिल्टर वापरून, हे धोरण उत्कृष्ट कामगिरीचे निर्देशक असलेल्या स्टॉक्सची निवड करते. हे बदलत्या बाजारपरिस्थितींशी सुसंगत राहते आणि निर्णय प्रक्रियेत भावनिक पूर्वग्रह दृष्टीकोनाचा प्रभाव कमी करते. भारतात, मोमेंटमगुंतवणूक ऐतिहासिक कामगिरीच्या डेटाचा फायदा घेते. निफ्टी२०० मॉमेंटम ३० सारख्या मोमेंटम निर्देशांकांनी वारंवार जोखमीच्या प्रमाणात विस्तृत मापदंडांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे.

# कलाकार सांगत आहेत हिवाळ्यामध्ये आस्वाद घेणाऱ्या भारतातील विविध राज्यांमधील त्यांच्या आवडत्या फूडबाबत!

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १ : थंडी सुरू झाली असताना आवडत्या ट्रसचा आस्वाद घेण्याची उत्सुकता वाढली आहे. वर्षातील या थंडीच्या काळाचा आनंद घेण्यासाठी एण्ड टीव्ही कलाकार हिवाळ्यातील त्यांचे आवडते स्नॅक्स आणि आस्वाद घेणाऱ्या स्वादिष्ट मिष्टान्नांबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत आयुध भानुशाली (मालिका अटलमधील यंग अटल), स्मिता साबळे (मालिका भीमामधील धनिया), योगेश त्रिपाठी (मालिका हप्पू की उलटन पलटनमधील दरोगा हप्पू सिंग) आणि शुभांगी अत्रे (मालिका भाबीजी घर पर हैमधील अंगूरी भाबी). मालिका अटलमध्ये यंग अटलची भूमिका साकारणारा आयुध भानुशाली म्हणाला, हिवाळ्यामध्ये मला माझ्या आईने बनवलेल्या स्वादिष्ट गुजराती पाककलांचा आस्वाद घ्यायला आवडतो. ती ताज्या हंगामी भाज्या, मेथी मुथिया (मेथीचे डम्पलिंग्स) व सुगंधी मसाल्यांसह बनववणारे उंधियू मला खूप आवडते. माझ्या टिफिनमध्ये ते नेहमी असते आणि माझे सह-कलाकादेखील
या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतात. आणखी एक आवडते म्हणजे थेपला, जे चुंदो (गोड आंब्याचे लोणचे) किंवा दहीसोबत खाता येते आणि हिरव्या चटणीसोबत मेथी नो गोटा (मेथीची भजी). या होममेड ट्रिट्स मालिका अटलच्या सेटवर उबदारपणा व प्रेमाची भर करतात. मालिका भीमामध्ये धनियाची भूमिका साकारणाऱ्या स्मिता साबळे म्हणाल्या, मी हिवाळ्यामध्ये पारंपारिक मिष्टान्नांचा आस्वाद घेण्यास उत्सुक असते. मला झुणका व ठेचासोबत भाकरी खायला आवडते, जे स्वादिष्ट व तिखट असते. तीळ व गुळासह बनवले जाणारे तिळाचे लाडू मला खूप आवडतात, ज्यामध्ये माझ्या आजीची आठवण सामावलेली आहे. रात्री थंडाव्यादरम्यान केशर व ड्रायफ्रूट्स असलेल्या कपभर मसाला दूधामधून मला आरामदायीपणा मिळतो. महाराष्ट्रात **हिवाळ्यामध्ये बनवल्या जाणाऱ्या पुरणपोळीचा आस्वाद**
घेण्यासारखा दुसरा आनंद नाही. मी माझ्या कुटुंबासोबत पुरणपोळी तयार करण्याचा आनंद घेते. मालिका हप्पू की उलटन पलटनमधील योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग म्हणाले, हिवाळा येताच उत्तर प्रदेशमधील माझ्या बालपणीच्या आठवणी जागृत होतात. क्रीमी मखन-मलाईकिंवा निमिश आणि तूपासह बनवले जाणारे गुड के पराठे यांसारख्या पाककला मला जुन्या आठवणींमध्ये घेऊन जातात. मुंबईतील हिवाळ्यामधील ट्रिट्स जसे मसालेदार पावभाजी वेगळ्या मोहकतेचा अनुभव देते. माझ्या कुटुंबासोबत या पाककलांचा आस्वाद घेण्याचा अनुभव अत्यंत खास आहे, ज्यामध्ये उत्तर प्रदेशमधील पारंपारिक फ्लेवर्स आणि मुंबईतील स्वादिष्ट फूडचे मिश्रण असते. मालिका भाबीजी घर पर हैमध्ये अंगूरी भाबीच्या भूमिका साकारणाऱ्या शुभांगी अत्रे म्हणाल्या, हिवाळा जादुई ऋतू आहे आणि मी या ऋतूमध्ये स्वादिष्ट फूडचा मनसोक्त आस्वाद घेते. यंदा, मी भारतीय पाककलांसह वेस्टर्न आवडत्या पाककलांचा देखील आस्वाद घेणार आहे. यूएसमध्ये असलेल्या माझ्या मुलीच्या सांगण्यामधून प्रेरणा घेत मी पंपकिन पाई बनवायला शिकले आहे आणि ते कुटुंबाचे आवडते बनले आहे. इंदौरमधील रताळ्यांचे तुकडे तळून तयार केले जाणाऱ्या मसालेदार गरडू चाटचा आस्वाद हिवाळ्यामध्ये घेतलाच पाहिजे. या डिशेस घरीच बनवल्याने बाहेर दूर जावे लागत नाही आणि फ्लेवर्सचा आस्वाद घेत माझ्या कुटुंबासोबत
वेळ व्यतित करण्याची संधी मिळते.

# मी प्रथमच खलनायकी भूमिकेमध्ये प्रवेश करणार आहे. असे झी टीव्हीवरील बस इतना सा ख्वाबमधील भूमिका गुरूंग म्हणाली

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १ :
अनेक घरांमध्ये घरातील गृहिणीच्या भूमिकेकडे कोणाचे लक्षच जात नाही बचत करण्यासाठी, नियोजन करण्यासाठी आणि घरातल्यांची काळजी घेण्याचे दैनंदिन प्रयत्न हे त्या परिवाराच्या रोजच्या आयुष्यामध्ये शांतपणे जणू गुंफलेले असतात, पण तरीही घरातील कर्त्या पुरूषाएवढे महत्त्व त्यांना फारसे कधी मिळत नाही. झी टीव्हीवरील नवीन मालिका बस इतना सा ख्वाब ही कानपुरमधील एक गृहिणी अवनी त्रिवेदीच्या जीवन प्रवासाची कथा आहे. ती दररोज छोटे छोटे त्याग करत असते आणि आपल्या परिवाराच्या सौख्यासाठी अथक झटत असते. आपले प्रत्येक काम ती स्वतः करते आणि अगदी एक एक रूपयासुद्धा वाचवण्याचा प्रयत्न करते. आपल्या परिवाराच्या मोठे घर घेण्याच्या स्वप्नामध्ये आपल्या परीने योगदान देण्याचा प्रयत्न ती करते. असे असले तरी अवनीचे हे समर्पण गृहितच धरले जाते. हल्लीच घोषित करण्यात आले की लोकप्रिय कलाकार अनुक्रमे राजश्री ठाकूर आणि योगेन्द्र विक्रम सिंग हे
ह्या मालिकेत अवनी आणि शिखर यांच्या मुख्य भूमिका साकारणार आहेत. गुणी अभिनेत्री भूमिका गुरूंग ह्या मालिकेत शिखरची बहिण शगुनच्या रूपात दिसून येणार असून तिची भूमिका संपूर्णपणे खलनायकी आहे. शगुनचे लग्न मोडले असून ती अवनी आणि शिखर यांच्यासोबत राहते. अवनीच्या विरोधात शिखरच्या मनात द्वेष निर्माण होईल यासाठी ती कटकारस्थाने करते. भूमिका गुरूंग म्हणाली, मला वाटतं शगुनची व्यक्तिरेखा ही अतिशय जटिल आणि रोचक आहे,
तिच्यासोबत वाईट वागलेल्या लोकांसाठी तिच्या मनात मत्सर आणि द्वेषही आहे. ती धूर्त, कारवाया करणारी आणि आपल्याला काही हवं असेल तर त्यासाठी इतरांच वापर करून



घ्यायला लाजत नाही. माझ्यासाठी एवढी खलनायकी भूमिका साकारणे थरारक आणि नवीन अनुभव आहे. भूतकाळात मी नेहमीच सकारात्मक भूमिका साकारलेल्या आहेत, पहिल्यांदाच मी खलनायकी भूमिकेमध्ये प्रवेश करत आहे. मला हे आव्हान अतिशय आवडत असून एवढे स्तर असलेल्या ह्या व्यक्तिरेखेचा शोध घेण्याची संधी म्हणून याकडे पाहत आहे. प्रेक्षकांची प्रतिक्रिया काय असेल हे जाणून घेण्यासाठी मी उत्सुक आहे. अवनीच्या कथेच्या माध्यमातून बस इतना सा ख्वाब ह्या मालिकेला एक शक्तीशाली संदेश प्रदान करायचा आहेः की घराच्या चार भिंतींमध्ये शंभर जबाबदाऱ्या सहजपणे हाताळणाऱ्या गृहिणी निश्चितपणे घराचा उंबरठा ओलांडून बाहेरच्या मोठ्या जगात प्रवेश करून आपल्या घरासाठीही कमवू शकतात जो घर संभाल सकती है, वो घर चला भी सकती है. काय शगुन असताना अवनी ह्या मोठ्या वाईट जगामध्ये यशस्वी होऊ शकेल? अधिक जाणून घेण्यासाठी पहा अवनीची प्रेरणादायी कथा बस इतना सा ख्वाबच्या प्रीमिअरसह.

# कलाकार त्यांच्या वॉलेट्समध्ये काय ठेवतात?



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १ : आपल्या वॉलेट्समध्ये अनेकदा महत्त्वाच्या गोष्टी असतात, पण अनेकांसाठी त्या अधिक अर्थपूर्ण देखील असतात, ज्यामध्ये वैयक्तिक महत्त्वाच्या गोष्टी असतात. फोटोग्राफ, एखादी लकी नोट किंवा संस्मरणीय अशा वस्तू दररोज आपल्या जीवनातील महत्त्वपूर्ण गोष्टींची दररोज आठवण करून देतात. एण्ड टीव्हीवरील अपवादात्मक अभिनय व मालिकेमधील प्रबळ उपस्थितीसाठी लोकप्रिय असलेले कलाकार देखील त्यांच्या वॉलेट्समध्ये वैयक्तिक महत्त्वाच्या गोष्टी ठेवतात आणि वॉलेट्स नेहमी त्यांच्यासोबत असतात. हे कलाकार आहेत रवी महाशब्दे (मालिका अटलमधील क्रिष्णन बिहारी वाजपेयी), अमित भारद्वाज (मालिका भीमामधील मेवा), गीतांजली मिश्रा (मालिका हप्पू की उलटन पलटनमधील राजेश) आणि रोहिताश्व गौड (मालिका भाबीजी घर पर हैमधील मनमोहन तिवारी). मालिका अटलमध्ये क्रिष्णन बिहारी वाजपेयीची भूमिका साकारणारे रवी महाशब्दे म्हणाले, माझ्या वॉलेटमध्ये गणपती बाप्पाचा फोटो आहे, जो किशोरवयीन काळापासून माझ्यासोबत आहे. या फोटोचे माझ्या मनात अविश्वसनीय विशेष स्थान आहे. हा फोटो आध्यात्मिकतेचे प्रतीक असण्यासोबत सतत मला बाप्पाचा आशीर्वाद माझ्यासोबत असल्याचे आठवण करून देतो. असा काळ होता जेव्हा माझे वॉलेट रिकामे होते, पण बाप्पाचा फोटो कधीच काढून टाकला नाही. अडथळ्यांवर दूर करणारे आणि बुद्धीदेवता म्हणून ओळखले जाणारे गणपती बाप्पा माझ्या जीवनात मार्गदर्शक राहिले आहेत. वॉलेटमध्ये त्यांचा फोटो असल्याने मी जेथे जातो तेथे सोबत निष्ठा, संरक्षण व सकारात्मकता घेऊन जात असल्यासारखे वाटते. यामधून, मला विशेषत: आव्हानात्मक क्षणांमध्ये शांतता व ताकद मिळते आणि आत्मविश्वासाने पुढे जात राहण्याची आठवण होते. मालिका भीमामध्ये मेवाची भूमिका साकारणारे अमित भारद्वाज म्हणाले, मी माझ्या वॉलेटमध्ये नेहमी फॅमिली फोटो ठेवतो, ज्यामध्ये माझी पत्नी व मुलगी आहे. या फोटोचे माझ्यासाठी मोठे भावनिक महत्त्व आहे. हा फोटोपेक्षा ताकद, आशा व आनंदाचा स्रोत आहे. मी खचून जातो, काही खात्री नसते किंवा जीवनातील आव्हानांकडे पाहून घाबरून जातो तेव्हा या फोटोमधील त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यांकडे पाहतो, ज्यानंतर माझे मनोबल वाढते आणि माझ्यामध्ये धैर्य व सकारात्मकता जागृत होते. हा फोटो माझा अँकर आहे, मला कुठेही असलो तरी आसपास प्रेम व पाठिंब्याचे वातावरण असल्याची जाणीव करून देतो. मालिका हप्पू की उलटन पलटनमधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, माझ्या वॉलेटमध्ये नेहमी फूल असते, जे मला कॉलेजमध्ये असताना माझ्या प्रिय मित्राने दिले होते. हे फूल नाजूक असले तरी त्याचे मोठे भावनिक महत्त्व आहे आणि सतत मला जीवनातील त्या वेळेची आठवण करून देते, जो स्वप्नं, हास्य व अतूट नात्यांनी भरलेला होता.

# थर्ड जनरेशन होंडा अमेझचे फोटो लीक, अपडेटेड सेडानचे ऑफलाइन बुकिंग सुरू

■ महासागर प्रतिनिधी,
नवी दिल्ली, दि. १ :
होंडा कार्स इंडिया लोकप्रिय सेडान अमेझचे थर्ड जनरेशन मॉडेल लॉन्च करण्याच्या तयारीत आहे. यापूर्वी, २०२४ -चाचणी दरम्यान कव्हरशिवाय दिसली होती. नवीन पिढीच्या -च्या बाह्य आणि अंतर्गत डिझाइनची एक झलक मीडियावर शेअर केलेल्या फोटो आणि व्हिडिओंमध्ये दिसून आली आहे. यापूर्वी कंपनीने डिझाइन स्केच जारी केले होते. कार नवीन फ्रंट लुक आणि प्रगत सुरक्षा वैशिष्ट्यांसह येईल. नवीन पिढीची - भारतात ४ डिसेंबर रोजी लॉन्च होणार आहे. त्याची किंमत ७.५० लाख रुपये (एक्स-शोरूमपासून सुरू होऊ शकते. त्याची स्पर्धा नव्या पिढीतील मारुती डिझायर, टाटा टिगोर आणि ह्युंदाई ऑरा यांच्याशी असेल.
एलिव्हेटप्रमाणे स्लीक एलईडी हेडलाइट
होंडाने जारी केलेल्या स्केचनुसार, आगामी होंडा



अमेझचा लूक नवीन होंडा सिटी आणि आंतरराष्ट्रीय मॉडेल होंडा एकॉर्डपासून प्रेरित आहे. अमेझच्या पुढील बाजूस शार्प स्टाइलिंग लाईन्स आणि हेक्सागोनल ग्रिल आहेत.
यात दोन्ही बाजूंना एलईडी डीआरएलसह स्लीक एलईडी हेडलाइट्स आहेत, जे सारखे दिसतात. त्याच वेळी, फॉग लॅम्प त्यांच्या जागी आहेत. यात मल्टी-स्पोकअलॉय व्हील्स, स्लीक एलईडी टेललाइट आणि होंडा सिटीसारखे उच्च बंपर दिले जाऊ शकतात.
६ एअरबॅग आणि ..... ~~मिळू~~ शकतात
होंडाने नवीन पिढीच्या अमेझच्या केबिनचे स्केचही प्रसिद्ध केले आहे. यात नवीन डॅशबोर्ड लेआउट आणि एक नवीन केबिन थीम आहे, जी सिटी सेडान आणि एलिव्हेट एसयूव्हीपासून प्रेरित आहे.
केबिनच्या आत, यात काळ्या आणि बेज रंगाच्या थीमसह ३-स्पोक स्टीयरिंग व्हील आहे. डॅशबोर्डवर, यात फ्री-स्टँडिंगटचस्क्रीनसह पॅटर्न ट्रिम इन्सर्ट आहेत. अमेझमध्ये वायरलेस फोन चार्जर आणि सिंगल-पेन सनरूफ सारखी नवी वैशिष्ट्ये मिळू शकतात. सुरक्षिततेसाठी, मानक म्हणून ६ एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्थिरता नियंत्रण प्रगत ड्रायव्हिंग असिस्ट सिस्टम रीअर व्ह्यू कॅमेरा देखील प्रदान केला जाऊ शकतो.

# मालिका भाबीजी घर पर हैमधील रोहिताश्व गौड यांची मुलगी गिती त्यांच्यासोबत बॉलिवुडमध्ये पदार्पण करणार!

एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका भाबीजी घर पर हैमध्ये मनमोहन तिवारीची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेले रोहिताश्व गौड यांना खूप आनंद झाला आहे, कारण त्यांची मुलगी गिती गौड बॉलिवुडमध्ये पदार्पण करण्यास सज्ज आहे. बॉलिवुड, टेलिव्हिजन व रंगभूमीवर तीन दशकांहून अधिक काळाच्या उल्लेखनीय करिअरसह रोहिताश्व त्यांच्या मुलीसोबत सह-कलाकार म्हणून नवीन भूमिका साकारणार आहेत. अभिमान वाटण्यासह आनंदित झालेले रोहिताश्व गौड नवीन चॅप्टरचा उलगडा पाहण्यास सज्ज आहेत, ज्यामुळे हा प्रोजेक्ट त्यांच्या मोठ्या करिअरमधील भावनिक टप्पा ठरला आहे. लंडनमधील प्रतिष्ठित रॉयल अकॅडमी ऑफ ड्रामॅटिक आर्ट्स (आरएडीए)मध्ये नुकतेच अभिनयामध्ये फाऊंडेशन कोर्स पूर्ण केलेली गिती चित्रपटसृष्टीमध्ये तिचा प्रवास सुरू करण्यास उत्सुक आहे. आपला आनंद व्यक्त करत रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, आपल्या मुलांना करिअरची सुरूवात करताना पाहणे कोणत्याही वडिलासाठी अभिमानाचा क्षण असतो. गितीचा प्रवास जवळून पाहण्याची संधी मिळाली असल्याने मी स्वत:ला धन्य मानतो. तसेच आम्ही तिच्या पदार्पणीय चित्रपटामध्ये एकत्र काम करत आहोत, जेथे मी चित्रपटामध्ये देखील तिच्या वडिलांची भूमिका साकारत आहे. अभिनयामध्ये प्रवेश करणारी आमच्या कुटुंबामधील ही तिसरी पिढी आहे. माझे स्वर्गीय वडिल श्री. सुदर्शन गौड शिमलामध्ये आर्टिस्ट




होते आणि त्यांनी मध्ये ऑल-इंडिया आर्टिस्ट्स असोसिएशनची स्थापना केली होती. मी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एनएसडी)मध्ये अभिनयाचे धडे घेतले, तर गितीने आरएडीए येथे प्रशिक्षण घेतले आहे. मला तिचा खूप अभिमान वाटतो.
चित्रपटाबाबत सांगताना रोहिताश्व म्हणाले, कथानक विभिन्न सामाजिक वर्गांमधील दोन कुटुंबांच्या अवतीभोवती फिरते आणि मूल करिअर घडवण्यासाठी घर सोडून गेल्यानंतर त्यांच्यामधील भावनिक संघर्षांना सादर करते. हे कथानक प्रेक्षकांशी संलग्न होईल. गिती आणि माझ्यासोबत चित्रपटामध्ये संजय मिश्रासह अनेक प्रतिभावान कलाकार आहेत. आम्ही शूटिंग पूर्ण केली आहे आणि चित्रपट आता पोस्ट प्रॉडक्शनच्या टप्प्यात आहे. मी हा चित्रपट प्रदर्शित होण्याची आणि प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया पाहण्याची आतुरतेने वाट पाहत आहे.
रोहिताश्व गौड यांना मनमोहन तिवारीच्या भूमिकेत पाहण्यासाठी पाहत राहा मालिका भाबीजी घर पर है दर सोमवार ते शुक्रवार रात्री . वाजता फक्त एण्ड टीव्हीवर!

# मी प्रीता आहे आमचा प्रवास एकमेकांमध्ये असा काही गुंतलेला आहे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
एक पर्व जणू संपत आले आहे कारण गेली ७.५ वर्षे कुंडली भाग्य चे हृदय आणि आत्मा असलेली श्रद्धा आर्या अधिकृतपणे ह्या मालिकेचा निरोप घेत आहे. प्रीता म्हणून ओळखली जाणारी श्रद्धा आर्या आपल्यामागे जगभरातील लाखो चाहत्यांच्या मनाला स्पर्श करणारा वारसा सोडून जात आहे. आपल्या आयुष्यात एक नवीन धडा सुरू करत श्रद्धाने हल्लीच आपल्या गर्भारपणाची गोड बातमी सर्वांसोबत वाटली होती आणि त्यामुळे तिचा नवीन पर्वातील प्रवेश आणखी खास आणि मनस्पर्शी ठरणार आहे.
श्रद्धा आर्या म्हणाली, कुंडली भाग्यला निरोप देणे हे



एक पर्व संपल्यासारखे आहे हा धडा गेली ७.५ वर्षे माझ्या आयुष्यात सुरू होता. आयुष्यातील काही गोष्टी जणू डिफॉल्ट सेटिंगसारख्या बनून जातात आणि माझ्यासाठी ही मालिका अगदी तीच होती. कुंडली भाग्य हे माझे केवळ काम नव्हते तर हा माझ्या आयुष्याचा एक कधीही विभक्त न होणारा भाग बनली. प्रीता मी आहे, मी प्रीता आहे आमचा प्रवास एकमेकांमध्ये असा काही गुंतलेला आहे ज्याचा विचारही कधी केला नव्हता. ह्या मालिकेने मला अनेक आठवणी, एक कुटुंब आणि अनन्यसाधारण प्रेम दिले आहे. मी ह्या मालिकेत आईची भूमिकाही साकारली आहे आणि आता खऱ्या आयुष्यात मातृत्वामध्ये पदार्पण करताना मी जाणवतंय की प्रीताच्या प्रवासाने मला जीवनातील ह्या पर्वासाठी तयार केले. हे जणू आयुष्य कलेचे प्रतिबिंब आहे आणि त्याने मला ते पुन्हा जगण्याची संधी दिली. ज्या काही भावना मी साकारल्या आहे, ऑनस्क्रीन जे काही जी काही आव्हाने पेलली आहेत, त्यामुळे माझ्या स्त्रीत्वामध्ये योगदान मिळाले आहे.

# कॅलिडोस्कोप

## मामाच्या गावाला जाऊ या



*सुट्ट्या सुरू झाल्या की प्रत्येकाच्या डोळ्यासमोर तरळू लागते दाट सावलीच्या आवरणाखालची अशी वाट... पूर्वी ती मामाच्या गावाला घेऊन जायची. हवेत धुराच्या रेषा काढत आजोळच्या प्रेमळ गावापर्यंत नेऊन सोडायची. आता ती कुठल्याशा डेस्टिनेशनपर्यंत पोहोचवते इतकंच... पण आजही ती हवीहवीशी वाटते...*

## एकाच इमारतीत वीस हजार लोक!

**२०**०६ मध्ये प्रियदर्शनच्या दिग्दर्शनाखाली शाहिद कपूर, करीना कपूर, सुनील शेट्टी, राजपाल यादव आणि परेश रावल अभिनीत 'चुप चुप के' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवली नाही; पण त्यानंतर हा चित्रपट टीव्हीवर प्रदर्शित झाला, तेव्हा लोकांना तो खूप आवडला. चित्रपटाच्या दृश्यात राजपाल यादव शक्ती कपूरला विचारतो, 'या घरात किती कुटुंबे राहतात'. याला उत्तर देताना शक्ती कपूर म्हणतात, '१५-१६ फॅमिली' यानंतर राजपाल यादव म्हणतात, की आम्ही या घराला घर का म्हणतो, त्याला जिल्हा म्हणून का घोषित करत नाही. त्याचे कारण चीनमधील एका इमारतीमध्ये इतके लोक राहतात की ते पाहिल्यानंतर तुम्ही विचाराल की या इमारतीला इमारत का म्हणतात. राज्य का घोषित करत नाही?



जगातील सर्वात मोठी निवासी इमारत चीनमधील हांगझोउ येथील कियानजियांग सेंच्युरी सिटीमध्ये बांधलेली आहे. 'रीजेंट इंटरनॅशनल' ही जगातील सर्वात मोठी निवासी इमारत आहे. तिची उंची ६७५ फूट आहे. ही इमारत एस च्या आकारात बांधलेली आहे. सुरुवातीला हे स्मारक लक्झरी हॉटेल म्हणून बांधले गेले आणि नंतर त्याचे निवासी अपार्टमेंटमध्ये रूपांतर झाले. या ३९ मजली इमारतीत हजारो अपार्टमेंट आहेत. ज्यामध्ये २० हजारांहून अधिक लोक राहतात. त्यानुसार ही इमारत जगातील सर्वात मोठी निवासी इमारत आहे. चीनची 'रीजेंट इंटरनॅशनल बिल्डिंग' खूपच खास मानली जाते. केवळ बहुतेक लोक त्यात राहतात म्हणून नाही; पण या इमारतीत राहणाऱ्या लोकांना इमारतीच्या आतच सर्व सुविधा मिळत असल्याने. इमारतीच्या आत मोठे फूड कोर्ट, स्विमिंग पूल, किराणा दुकान, सलून आणि अनेक कॅफे आहेत. या इमारतीच्या आत सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत, म्हणूनच या इमारतीत राहणाऱ्या लोकांना स्वयंपूर्ण समुदाय असेही म्हणतात. या इमारतीची कमाल क्षमता ३० हजार लोकांची आहे. म्हणजेच सध्या आणखी १० हजार लोकांना त्यात [illegible]वून घेता येईल.

## मृत्यूनंतर पत्नीने खाल्ली राख!

लग्न आणि प्रेम नेहमी विश्वास आणि समजुतीच्या आधारावर केले जाते; पण अनेकदा लोक लग्नानंतर आपल्या पार्टनरची फसवणूक करतात. त्यामुळे व्यक्ती आतून हादरते. काही फसवणूक करण्यात यशस्वी होतात, तर काही रंगेहात पकडले जातात. लग्नाच्या नावाखाली एका कॅनडियन महिलेचा नवरा मरेपर्यंत तिची फसवणूक करत होता. नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्याची कृत्ये महिलेच्या पुढे आली. त्यानंतर पत्नीने असे पाऊल उचलले, की सर्वानाच धक्का बसला.



पतीच्या निधनानंतर पत्नीला त्याच्या दुष्कृत्याची कल्पना आली. जेसिका वेट या कॅनेडियन महिलेने तिच्या मृत पतीची अस्थिकलश कशी खाल्ली याची तिची सखोल आणि वैयक्तिक कथा शेअर केली आहे. तिच्या एका पुस्तकात, तिने तिच्या पतीच्या अनेक विवाहबाह्य संबंधांबद्दल आणि तिच्या आयपॅडच्या ब्राउझिंग इतिहासाद्वारे एस्कॉर्ट्सच्या वापराबद्दल तिला कसे छळले याचे वर्णन केले आहे. अपार दु:ख आणि विश्वासघात यामुळे वेट उध्वस्त झाला आणि परिणाम धक्कादायक होता. संतापलेल्या पत्नीने पतीची राख खाल्ली पतीच्या विश्वासघातामुळे ती महिला इतकी तुटली आणि असहाय्य झाली, की तिने प्रथम तिच्या पतीने ठेवलेल्या राखेमध्ये कुत्र्याची विष्ठा मिसळली आणि नंतर काही राख रिकामी केली. महिलेने सांगितले की, तिला तिच्या आयपॅडच्या सर्च हिस्ट्रीवरून तिच्या पतीच्या चुकीच्या कृत्यांची माहिती मिळाली. तिने विविध ठिकाणी विशिष्ट एस्कॉर्ट्स आणि त्यांच्या सेवांच्या किंमती शोधण्यासाठी आयपॅडचा चा वापर केला होता. तिला समजले, की तिचा नवरा नियमितपणे एस्कॉर्ट पाहत होता आणि अनेक महिलांसोबत तिची फसवणूक करत होता.

## पतीच्या मित्रांकडून लैंगिक छळ

**उ**त्तर प्रदेशातील रामपूर येथून एक हृदयद्रावक प्रकरण समोर आले आहे. तिथे एका व्यक्तीने जुगारात स्वतःच्या पत्नीला पणाला लावले आणि तिच्या मित्रांकडून तिचा लैंगिक छळ केला. महिला माहेरी गेली असता पतीने तिला मारहाण करून हाताची बोटे तोडली. आपल्या मित्रांसोबत जुगार खेळताना त्या माणसाने आपल्या पत्नीला हुसकावून लावले आणि त्यांना तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याची परवानगीदेखील दिली. ती आईच्या घरी गेली आणि परत येण्यास नकार दिला, तेव्हा त्याने तिला मारहाण केली आणि तिचे बोटदेखील तोडले.

उत्तर प्रदेशातील रामपूरमधील शाहबाद पोलिस ठाणे परिसरात राहणारी महिला, जिची ओळख गोपनीय ठेवली जात आहे. ती म्हणाली, की माझे २०१३ मध्ये लग्न झाले होते. माझे सासरे आणि माझे पती मला हुंड्यासाठी त्रास देत होते आणि मारहाण करत होते. माझा नवरा मद्यपी आहे आणि त्याला १२ बिघा (सुमारे सात एकर) जमीन आणि मी त्याच्या मित्रांसह ११२ महिलांच्या हेल्पलाइनला फोन केला. महिलेने आरोप केला आहे, की त्या व्यक्तीने आपल्या मित्रांना तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यास परवानगी दिली. ती म्हणाली, त्याने मला पाणीही प्यायला दिले नाही आणि त्याच्या मित्रांच्या



उपस्थितीत मला मारहाण केली. मी माझ्या आईच्या घरी गेले आणि ४ सप्टेंबर रोजी तो त्याच्यासोबत येथे आला. मित्रांनो, माझे बोट तोडले आणि मला घरी नेण्याचा प्रयत्न केला.

त्याने मला मारहाण केली आणि त्याचे मित्रही जेव्हा आमच्या शेजारी जमा झाले, तेव्हा ते पळून गेले, मला माझ्या पतीला जे काही वाचवायचे आहे.

ती म्हणाली, की त्यांनी माझ्यासोबत काय केले हे मी सांगूही शकत नाही. मी न्यायालयात सर्वकाही सांगेन. रामपूरचे पोलिस अधीक्षक विद्यासागर मिश्रा यांनी सांगितले, की गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. मिश्रा म्हणाले, तिने सांगितले की तिच्या पतीला जुगाराचे व्यसन आहे, त्याने आपली जमीन गमावली आहे आणि तिला मारहाण करत आहे.'

## अंडी जातात कचऱ्यात

**भा**रतात अंड्याची मागणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. अंड्यांमधून आपल्याला प्रथिनं मिळतात. त्यामुळे अनेकांना आहारात अंडी लागतात. अंडं अगदीच खराब निघालं तर आपण फेकून देतो. अन्यथा ते खाल्लं जातं. पण ब्रिटनमधले लोक असं करत नाहीत. ब्रिटनमध्ये दरवर्षी कोट्यवधी अंडी कचऱ्यात टाकली जातात. एका संशोधनानुसार इथले लोक दरवर्षी ७२० दशलक्ष म्हणजे ७२ कोटी अंडी फेकून देतात. २००८ मध्ये हाच आकडा १३९ दशलक्ष म्हणजे १३.९ कोटी इतका होता. आता यात तिपटीने वाढ झाली आहे. या देशातले २९ टक्के लोक अंडी फेकून देत असल्याचंही एका सर्वेक्षणातून समोर आलं आहे. यामागचं कारण जाणून घेतलं तर आपल्याला आश्चर्याचा धक्का बसेल. अंडी खाण्याचा कालावधी टळून जात असल्याने म्हणजे ती एक्सपायर होत असल्यामुळे ब्रिटिश लोक असं करतात. घरी आणलेली अंडी वेळेत खाता आली नाहीत तर ती कचऱ्यात टाकून देण्यावर त्यांचा भर असतो. अंडी शिळी झाल्यानंतर इथे ती खाल्ली जात नाहीत. अंडी खाण्यायोग्य आहेत किंवा नाही हे जाणून घेण्याची एक पद्धत आहे. पाण्याने भरलेल्या भांड्यात अंडी ठेवल्यानंतर तळाला



गेलेली अंडी ताजी असतात. अंडी थोडी शिळी झाली असली पण थोडी खाण्यायोग्य असली तर ती भांड्याच्या पृष्ठभागावर उभी राहतात. पण पाण्यात तरंगणारी अंडी खाण्यायोग्य नसतात. अंड्याचा ताजेपणा पडताळून पाहण्याची ही पद्धत ब्रिटनमध्ये अनेकांना माहीत नसल्यामुळे चांगली अंडीही कचऱ्यात फेकली जातात.

## नववधूला खांबाला बांधून त्रास!

**ल**ग्नाच्या विधींबद्दल लोकांमध्ये वेगळाच उत्साह असतो. लग्नात मनोरंजनासाठी आणि वातावरण प्रसन्न करण्यासाठी हे विधी केले जातात; परंतु काही प्रकरणांमध्ये या विधींबाबत वादही निर्माण होतात. चीनमधील लग्नाच्या विधीबद्दल लोक संतापले आहेत. येथे विधीच्या नावाखाली वधूला खांबाला बांधून त्रास दिला जातो. इतकेच नाही तर नववधू मदतीसाठी आरडाओरडा करते; पण तिचे ऐकायला किंवा मदत करायला तिथे कुणी नसते. येथे वधूला खांबाला बांधून त्रास दिला जातो.


लग्नाचे विधी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने पार पाडले जातात, पाळले जाणारे विधी एकतर काळाबरोबर जन्माला येतात किंवा खूप जुने असतात आणि जर पाळले नाहीत, तर ते अशुभ मानले जाते. असाच एक विधी सुमारे १०० वर्षे जुना असून अश्लील विधींबाबत चर्चा सुरू झाली आहे. एका वधूला वराच्या मित्रांनी टेपच्या साहाय्याने खांबाला बांधल्याने ही चर्चा सुरू झाली. 'साऊथ चायना मॉर्निंग पोस्ट'नुसार, काही लोकांनी एका महिलेला टेपने खांबाला बांधले होते. महिलेने लग्नाचा पोशाख परिधान केला होता. ती मदतीसाठी आरडाओरडा करत होती; पण तिला वाचवायला कोणीच येत नव्हते.

वृत्तानुसार, ज्या लोकांनी वधूला खांबाला बांधले, ते वराचे बालपणीचे मित्र होते. यांग नावाच्या वराच्या मित्राने सांगितले, की लग्नसमारंभात थोडासा गोंधळ घालण्याची आमची प्रथा आहे आणि हीच चांगल्या मित्रांची खूण आहे. यामध्ये कोणाचेही नुकसान झालेले नाही. समारंभाच्या वेळी वर तेथे उपस्थित होता आणि समारंभ करणाऱ्या समूहातील प्रत्येकाने वधूच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली. लोक या कर्मकांडाला छळ म्हणत आणि फक्त एक प्रहसन म्हणत. दुसऱ्याच्या दुःखावर तुमचा आनंद व्यक्त करणे ही अतिशय निरुपयोगी गोष्ट आहे.



## भटका आणि कमवा !

**ज**गभरात भटकंती करणं हे अनेकांचं स्वप्न असतं. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बरेच लोक झटत असतात. त्यातच फिरण्याची नोकरी मिळाली तर खूप मजा येईल आणि या कामातून लाखो रुपयांची कमाई झाली तर काही बघायलाच नको. एका तरुणाने अशा अनोख्या नोकरीचा प्रस्ताव ठेवला. आपल्यासोबत जगभ्रमंतीला येणाऱ्या व्यक्तीला जवळपास २६ लाख रुपयांचं वार्षिक पॅकेज देण्यात येतील, असं त्याने जाहीर केलं. अर्थात यासाठी त्याची एक अटही होती. मॅथ्यू लेपरने यूट्यूबवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. जगभरात फिरताना आपली मदत करण्यासाठी सहाय्यक हवा असल्याचं त्याचं म्हणणं होतं. यासोबतच कंपनीच्या टीमच्या व्यवस्थापनाची जबाबदारीही त्या व्यक्तीने सांभाळायला हवी. या कामासाठी मॅथ्यू आपल्या कर्मचाऱ्याला २५.७५ लाख रुपये वार्षिक पॅकेज देणार आहे. यासोबतच या कर्मचाऱ्याला रहायला आलिशान घर आणि आरोग्य विमाही दिला जाणार आहे. मॅथ्यू लेपर करोडपती असून ई कॉमर्सच्या चार कंपन्यांचा मालक आहे. या नोकरीसाठी ४० हजारपेक्षा जास्त लोकांनी अर्ज दिला आहे. यात ७५ टक्के महिला उमेदवार असून त्यांचं वय २३ ते ३७ च्या दरम्यान आहे. यासाठी मॅथ्यूला कॉम्प्युटरचं चांगलं ज्ञान असलेली व्यक्ती हवी आहे. सोशल मीडियाची माहिती असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिलं जाणार आहे. ही सुवर्णसंधी साधणारा उमेदवार नशीबवानच म्हटला पाहिजे.



## रोबो शेतकरी

**आ**जच्या जगात रोबो काय करत नाहीत, हाच प्रश्न विचारायला हवा. बँकेत काम करण्यापासून हॉटेलमध्ये स्वयंपाक करेपर्यंत त्यांच्याकडे सगळं काही सोपवलं जातं. हेच रोबो आता शेतात राबणार आहेत. ब्रिटनमधल्या एका ॲग्रीकल्चर टेक्नॉलॉजी स्टार्टअपने तीन रोबो तयार केले आहेत. हे रोबो शेतात काम करतात. टॉम, डिक आणि हॅरी या नावांचे हे रोबो कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहेत. पेरणीपासून कापणीपर्यंतचं प्रत्येक काम हे रोबो करू शकतात, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. त्यातला एक रोबो ट्रॅक्टरप्रमाणे काम करतो तर इतर दोघे पिकाच्या गुणवत्तेकडे लक्ष ठेऊन असतात. 'स्मॉल रोबो कंपनी'ने हे अनोखे रोबो तयार




केले.अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असे हे रोबो शेतीतलं भविष्य ठरू शकतात. यामुळे मानवी श्रम बऱ्याच अंशी कमी होऊ शकतात. इतकंच नाही तर शेतीचा दर्जाही सुधारू शकतो. हे रोबो शेतातली सगळी कामं करायला सक्षम असल्यामुळे त्यांचा खूप चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकतो. भारतासारख्या कृषीप्रधान देशात हे रोबो उपयुक्त ठरू शकतील.

## जबडा की ब्लॅक होल ?

**आ** वासल्यानंतर आपलं तोंड मर्यादित प्रमाणात उघडतं. पण अंगोलात राहणाऱ्या एका व्यक्तीचं तोंड इतकं मोठं आहे की आ वासल्यानंतर त्याच्या तोंडात कोल्डड्रिंकचा कॅनही अगदी व्यवस्थित सामावतो. त्याचं तोंड जवळपास साडेसहा इंच रुंद आहे. एवढ्या मोठ्या तोंडामुळे त्याचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदलं गेलं आहे. फ्रान्सिस्को डोमिंगो असं या माणसाचं नाव असून तो ३१ वर्षांचा आहे. त्याच्या तोंडात ३३० मिलीलीटरचा कोल्डड्रिंकचा कॅन अगदी सहज मावतो. जनुकीय रचनेमुळे फ्रान्सिस्कोचं तोंड दोन्ही बाजूंनी ओढल्यानंतर एवढं मोठं दिसतं. त्याला 'कनेक्टिव्ह टिश्यू डिसऑर्डर' आहे.

२०१० मध्ये २० वर्षांचा असताना त्याने आपल्याला लाभलेल्या या नैसर्गिक वरदानाचा वापर स्वत:चं कौशल्य दाखवण्यासाठी करायचं ठरवलं. त्याने रोममधल्या 'बिग माउथ' स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धकांना तोंडात बिअरच्या बाटल्या, कॉफीचे कप, बशी असं बरंच काही ठेवायचं होतं. पण फ्रान्सिस्कोला कोणीतही मात देऊ शकलं नाही. त्याने ३३० मिलीलीटरचा कोल्डड्रिंकचा कॅनच तोंडात ठेवला. त्याचं हे कौशल्य पाहून सर्वजण अचंबित झाले. त्याला इटालियन टीव्हीवरही आमंत्रित करण्यात आलं होतं. सोशल मीडियातही तो खूपच लोकप्रिय आहे. अंगोलातल्या शहरांमधल्या रस्त्यांवरही तो आपलं कौशल्य दाखवत असतो. त्यामुळे देशभरात त्याला खूप लोकप्रियता मिळाली आहे. या जगात कोणाकडे कोणतं कौशल्य असेल याचा काहीच नेम नाही.



## ठरवलं तर...

**मा**णसांनी एकत्र येऊन काही चांगलं करायचं ठरवलं तर काय होऊ शकतं याची अनेक उदाहरणं आपल्याला पहायला मिळतात. त्यापैकी एक उदाहरण म्हणजे पुण्यातल्या बाणेर परिसरातली तुकाई टेकडी. ही टेकडी मध्यंतरी डंपिंग ग्राउंड झाली होती. सगळीकडे फक्त कचऱ्याचं साम्राज्य होतं. जिथे पहावं तिथे फक्त कचऱ्याचे ढीग साचलेले दिसायचे. पण आज ही टेकडी हिरवीगार दिसते. कधीकाळी या टेकडीवर कचऱ्याचं साम्राज्य होतं यावर सांगूनही कोणाचा विश्वास बसणार नाही इतकं तिचं रुपडं पालटलं आहे. १३ वर्षांपूर्वीपर्यंत म्हणजे २००६ पर्यंत तुकाई टेकडी परिसरात नाक बंद करूनच यावं लागायचं. इथल्या २०० एकर परिसरात खूप दुर्गंधी येत असे. पण २००६ मध्ये इथल्या काही नागरिकांनी टेकडीच्या स्वच्छता मोहीम हाती घेतली. 'वसुंधरा अभियान' या नावाने मोहीम सुरू करण्यात आली. १५ वर्षांत इथे तब्बल २१



हजार झाडं लावण्यात आली. त्यावेळी १५ लोकांनी टेकडीच्या सौंदर्यीकरणाची मोहीम हाती घेतली होती. त्यानंतर या मोहिमेशी अनेक जण जोडले गेले. पंधरा लोकांच्या तीस हातांना बळ मिळत गेलं आणि ही संख्या पाच हजारच्या घरात पोहोचली. विशेष म्हणजे या गटाचा कोणीही प्रमुख नाही. सर्व जण स्वयंस्फूर्तीने एकत्र आले आहेत. हे सर्व लोक मानवी साखळी तयार करून टेकडी आणि इथल्या झाडांची देखभाल करतात. टेकडीवरून पावसाचं पाणी वाहून जाऊ नये म्हणून ती सपाट करण्यात आली. त्यानंतर इथे झाडांची लागवड करण्यात आली. परिसर स्वच्छ राहावा, इथली हिरवळ टिकून राहावी यासाठी अनेक जण सकाळ-संध्याकाळ श्रमदान करतात. एकीचं बळ काय असतं हे यावरून आपल्या लक्षात येईल.

